शिक्षण / आरोग्य / रोजगार / कला /क्रीडा / महिला सक्षमीकरण

# रयत विद्यार्थी विचार मंच

संस्थापक / अध्यक्ष : धम्मराज साळवे


➢ **कार्यअहवाल : सन २०२४**

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाल्यानंतर देखील आजही एक मोठा वर्ग शिक्षणापासून वंचित आहे.अनेक विद्यार्थी आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण अर्ध्यावर सोडतात. मराठवाड्यातील एका विद्यार्थीनीने बस पास साठी २५० रूपये नाहीत म्हणून आत्महत्या केली. अनेक विद्यार्थी आपल्या शिक्षणाचे ओझे पालकांवर नको म्हणून शेतकरी कुटुंबातील विद्यार्थी अर्ध्यावर शिक्षण सोडतात किंवा आत्महत्या करतात.एवढ्या शुल्लक कारणांसाठी विद्यार्थ्यांनी अर्ध्यावर शिक्षण सोडणे किंवा आत्महत्या करणे हे अतिशय दुर्देवी आहे.आपल्या अवती भोवती अनेक गरजु, होतकरू विद्यार्थी शिक्षणापासुन वंचित राहतात त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणुन शैक्षणिक प्रगल्भ करणे हा देशाच्या विकासाचा पाया आहे. आपण सर्व विद्यार्थी मिळुन आपल्यातील गरजु व होतकरू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन त्यांना सक्षम करूया. याकरिता रयत विद्यार्थी विचार मंच कार्य करत आहे. आपणही या संकल्पनेत सहभाग घेऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मदतीचा हात पुढे करूया..

- **धम्मराज नवनाथ साळवे**

**संस्थापक / अध्यक्ष**




चला बनू भविष्य जगाचे...
art_bhagyashree




## दिनांक ०१ जानेवारी २०२४
## दैनिक प्रभात वर्धापन दिन

दैनिक प्रभात या वृत्तपत्राच्या वर्धापन दिनानिमित्त रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या.

# बालवाडीतील ५५ विद्यार्थी आजाराने ग्रस्त

## 'लवकर निदान व लवकर उपचार' मोहिमेतून होणार उपचार, आणखी दोनशे बालवाडींचे होणार सर्वेक्षण

▸ विकास शिंदे
feedback@civicmirror.in

महापालिकेच्या बालवाडी आणि अंगणवाडीत शिक्षण घेणाऱ्या ० ते ६ वर्ष वयोगटातील ५५ विद्यार्थी विविध आजारांनी ग्रस्त असल्याची धक्कादायक बाब दिव्यांग पुनर्वसन केंद्र पुणे यांनी केलेल्या सर्वेक्षणात आढळून आली आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांवर 'लवकर निदान व लवकर उपचार' उपक्रमातून मोफत उपचार करून त्यांच्यावर निदान केले जाणार आहे. तसेच आणखी दोनशे बालवाडींचे सर्वेक्षण देखील हाती घेण्यात आले आहे. दरम्यान, शहरात गल्लीगल्ली नर्सरी, प्ले ग्रुप, ज्युनिअर केजी, सीनियर केजी, अंगणवाडी अशा हजारो खासगी शाळा असून त्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या ० ते ६ वर्ष वयोगटातील विद्यार्थ्यांचे देखील सर्वेक्षण करणे आवश्यक आहे. त्या खासगी शाळेतून देखील काही विद्यार्थी आजारग्रस्त असल्याचे आढळून येतील. जेणेकरून लहान वयात त्या विद्यार्थ्यांवर उपचार झाल्यास निश्चित मदत होईल, अशी मागणी पालकवर्गातून होऊ लागली आहे.

पुणे जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राला पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने १२ ऑक्टोबर २०२२ रोजी दिलेल्या पत्रानुसार दोन्ही संस्थांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर एक वर्षाचा करार करण्यात आला. त्यानुसार महापालिका आणि दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या वतीने प्रायोगिक तत्त्वावर दहा बालवाड्यांत 'लवकर निदान, लवकर उपचार' हा उपक्रम हाती घेण्यात आला.

महापालिकेच्या बालवाडीत शिक्षण घेणाऱ्या ० ते ६ वयोगटातील विद्यार्थ्यांच्या आरोग्याची तपासणी, सर्वेक्षण करण्यात आले. यामध्ये फुगेवाडी,



केशवनगर, लांडेवाडी, चिंचवड, सांगवी, थेरगाव, खराळवाडी, म्हेत्रे वस्ती, नेहरूनगर, मोहननगर या बालवाडी पहिल्या टप्प्यात घेण्यात आल्या. त्या बालवाडीत शिकणारे ५५ विद्यार्थी वेगवेगळ्या आजारांनी ग्रस्त असल्याचे आढळून आले. त्यात कर्णबधिर, अस्थिव्यंग, मतिमंद, गतिमंद, सेलिब्रेट पारसी, स्वमग्न अशा प्रकारचे आजार असल्याचे आढळून आले. पुणे जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राकडून दिव्यांग बालकांना प्राथमिक अवस्थेत विविध स्तरावरील प्रशिक्षण देण्यात येते. दिव्यांग केंद्राकडून महापालिकेतील बालवाडी ताई, अंगणवाडी ताई, आशा वर्कर आदींना लवकर निदान व लवकर उपचारांतर्गत प्रशिक्षण दिले गेले आहे. त्यांच्या मदतीने वैद्यकीय सेवा, दिव्यांगत्व प्रमाणपत्र, विविध प्रकारची थेरपी, कृत्रिम अवयव आणि साधनांची उपलब्धता यासारखे उपक्रम राबविण्यात येत आहेत. महापालिकेच्या बालवाडीत विविध आजारांनी ग्रस्त असलेल्या ५५ विद्यार्थ्यांवर जिल्हा रुग्णालय, सांगवी आणि महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात स्पीच थेरपी, फिजिओथेरपी यासह अन्य उपचार केले जात आहेत. महापालिका व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राने हा प्रकल्प सुरुवातीला प्रायोगिक तत्त्वावर १० बालवाडीत राबविण्यात आला. त्याच आधारावर पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील आणखी एकूण २०० बालवाड्यांमध्ये पुढील ५ वर्षांसाठी 'लवकर निदान व लवकर उपचार' ही मोहीम राबविली जाणार आहे. त्यामुळे लहान वयातच दिव्यांगत्व आल्यास लवकर वेळेत उपचार होऊन खऱ्या अर्थाने त्या विद्यार्थ्यांचे पुनर्वसन होणार आहे.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीत गल्लोगल्ली बालवाडी, नर्सरी, प्ले ग्रुप, ज्युनिअर केजी, सीनिअर केजी, अंगणवाडी अशा वेगवेगळ्या खासगी शाळादेखील सुरू आहेत. त्या शाळेतून देखील शहरातील करदात्या नागरिकांची मुले-मुली शिक्षण घेत आहेत. महापालिकेचा समाज विकास विभाग आणि जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राने खासगी शाळेत शिक्षण घेणाऱ्या ० ते ६ वयोगटातील विद्यार्थ्यांचे देखील सर्वेक्षण करण्यात यावे. जेणेकरून हजारो विद्यार्थी वेगवेगळ्या आजारांचे आढळून येतील. त्यांच्यावर देखील 'लवकर निदान व लवकर उपचार' मोहिमेतून उपचार केल्यास ते विद्यार्थी देखील बरे होण्यास मदत होईल.

> अभिनव प्रकल्प कार्यान्वित करण्यात पिंपरी-चिंचवड महापालिका राज्यात अग्रेसर आहे. महापालिकेच्या २१० बालवाडीत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण केले जाणार आहे. पुढील पाच वर्षांत विविध आजारांनी ग्रस्त असलेल्या सर्व विद्यार्थ्यांवर दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या पुढाकाराने 'लवकर निदान व लवकर उपचार' मोहिमेतून उपचार केले जातील.
>
> **- अजय चारठाणकर** उपायुक्त, समाज विकास विभाग, महापालिका पिंपरी-चिंचवड

> महापालिकेने प्रकल्प संचालक, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राकडे प्रस्ताव सादर केला. त्यानुसार आम्ही 'लवकर निदान व लवकर उपचार' हा प्रायोगिक प्रकल्प राबविण्यास दोन्ही संस्थांनी पाच वर्षांचा करार केला. यातून २१० बालवाडीत सर्वेक्षण करून त्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांवर लहान वयात उपचार केल्यास त्यांचे खऱ्या अर्थाने पुनर्वसन होणार आहे.
>
> **- अशोक सोळंकी**, समन्वयक, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, पुणे

> महापालिका हद्दीतील प्रत्येक नागरिक हे करदाते आहेत. त्या नागरिकांची मुले-मुली देखील खासगी शाळेत शिक्षण घेत आहेत. शहरातील गल्ली-बोळात प्ले ग्रुप, नर्सरी, ज्युनिअर केजी, सीनिअर केजी, अंगणवाडी अशा शेकडो शाळेतून ० ते ६ वयोगटातील हजारो विद्यार्थी शिकत आहेत. त्या विद्यार्थ्यांचेदेखील महापालिकेने सर्वेक्षण करावे, त्यातून वेगवेगळ्या आजारांचे विद्यार्थी सापडू शकतात. त्या विद्यार्थ्यांवरदेखील लहान वयातच उपचार झाल्यास ते दिव्यांग होण्यापासून वाचण्यास मदत होईल. **- संतोष शिंदे**, सचिव, रयत विद्यार्थी विचार मंच

महापालिका हद्दीतील प्रत्येक नागरिक हे करदाते आहेत. त्या नागरिकांची मुले-मुली देखील खासगी शाळेत शिक्षण घेत आहेत. शहरातील गल्ली-बोळात प्ले ग्रुप, नर्सरी, ज्युनिअर केजी, सीनिअर केजी, अंगणवाडी अशा शेकडो शाळेतून ० ते ६ वयोगटातील हजारो विद्यार्थी शिकत आहेत. त्या विद्यार्थ्यांचेदेखील महापालिकेने सर्वेक्षण करावे, त्यातून वेगवेगळ्या आजारांचे विद्यार्थी सापडू शकतात. त्या विद्यार्थ्यांवरदेखील लहान वयातच उपचार झाल्यास ते दिव्यांग होण्यापासून वाचण्यास मदत होईल. - संतोष शिंदे, सचिव, रयत विद्यार्थी विचार मंच

दिनांक ०१ जानेवारी २०२४





## दिनांक ०३ जानेवारी २०२४
## सावित्रीमाईला वंदन

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या पिंपरी चिंचवड शहर कार्यकारणी टीमच्या वतीने क्रांतीजोती सावित्रीमाई फुले यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले यावेळी संस्थेचे प्रदेश महासचिव संतोष शिंदे,पश्चिम महाराष्ट्र सचिव समाधान गायकवाड,पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष अभिषेक चक्रनारायण,उपाध्यक्ष भाग्यश्री आखाडे,सदस्य वैष्णवी डावरे इ.पदाधिकारी उपस्थित होते..

## रयत विद्यार्थी विचार मंचातर्फे सावित्रीबाईंच्या प्रतिमेचे पूजन

**पिंपरी, दि.३ (प्रतिनिधी)** - रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना जयंतीनिमित्त वंदन करण्यात आले. या वेळी सावित्राबाई फुले स्मारक, पिंपरी येथे हा कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी संस्थेच्या पिंपरी चिंचवड शहराच्या उपाध्यक्ष भाग्यश्री आखाडे व सदस्य वैष्णवी डावरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

संस्थेचे प्रदेश महासचिव संतोष शिंदे म्हणाले की, महिलांनी सावित्रीबाईंचा आदर्श घेऊन शिक्षणाच्या जोरावर मोठ्या मोठ्या पदावर जाऊन केवळ स्वतःपुरता विचार न करता त्या पदाचा वापर या शोषित पीडित समाजासाठी केला पाहिजे. या वेळी पश्चिम महाराष्ट्र सचिव समाधान गायकवाड, पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष अभिषेक चक्रनारायण, उपाध्यक्ष भाग्यश्री आखाडे, सदस्य वैष्णवी डावरे आदी उपस्थित होते.

# संक्षिप्त बातम्या...



## क्रांतीजोती सावित्रीबाई फुले यांना जयंतीनिम्मित अभिवादन

पुणे : रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने क्रांतीजोती सावित्रीमाई फुले यांना जयंतीनिमित्त सावित्राबाई फुले स्मारक,पिंपरी या ठिकाणी अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेच्या पिंपरी चिंचवड शहराच्या उपाध्यक्ष भाग्यश्री आखाडे व सदस्य वैष्णवी डावरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी संस्थेचे प्रदेश महासचिव यांनी जयंतीच्या शुभेच्छा देताना असे मत व्यक्त केले कि आजच्या महिलांनी सावित्रीबाईंचा आदर्श घेऊन शिक्षणाच्या जोरावर मोठ्या मोठ्या पदावर जाऊन केवळ स्वतःपुरता विचार न करता त्या पदाचा वापर या शोषित पीडित समाजासाठी केला पाहिजे तीच खरी सावित्रीमाईला आदरांजली ठरेल. यावेळी संस्थेचे प्रदेश महासचिव संतोष शिंदे,पश्चिम महाराष्ट्र सचिव समाधान गायकवाड,पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष अभिषेक चक्रनारायण,उपाध्यक्ष भाग्यश्री आखाडे,सदस्य वैष्णवी डावरे इ.पदाधिकारी उपस्थित होते.

पिंपरी-चिंचवड

पिंपरी-चिंचवड TODAY पुणे, गुरुवार, ४ जानेवारी २०२४ सकाळ

# सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

## शाळांमध्ये विविध कार्यक्रमांनी बालिका दिवस उत्साहात

**पिंपरी, ता. ३ : देशातील स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त शहरातील विविध शाळांमध्ये बालिका दिवस साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी नृत्य, गायन, वक्तृत्व आदींमधून सावित्रीबाईंना अभिवादन केले. सावित्रीबाईंनी स्त्री शिक्षणाची केलेली सुरुवात आणि त्याचे आज महत्त्व याबाबत शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महापालिका आवारात रांगोळीच्या माध्यमातून सावित्रीबाई फुले यांचा जीवनपट रेखाटण्यात आला. ती रांगोळी पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती.**



पिंपरी : सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त महापालिकेत साकारलेली रांगोळी पाहताना आयुक्त शेखर सिंह आणि अधिकारी.

### रयत विद्यार्थी विचार मंच

पिंपरीतील सावित्राबाई फुले स्मारक येथे रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्यावतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेच्या शहर उपाध्यक्षा भाग्यश्री आखाडे, सदस्या वैष्णवी डावरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी संस्थेचे प्रदेश महासचिव संतोष शिंदे, पश्चिम महाराष्ट्र सचिव समाधान गायकवाड, शहराध्यक्ष अभिषेक चक्रनारायण उपस्थित होते.

### फुले यांच्या जीवनावर रांगोळी

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले जयंती दिन हा महिला शिक्षण दिन म्हणूनही साजरा झाला. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्यावतीने यानिमित्त एकदिवसीय विचार प्रबोधन पर्व साजरे होत आहे. महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये सुप्रसिद्ध चित्रकार सोमनाथ भोंगळे (सासवड) आणि सहकारी यांनी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित रांगोळी रेखाटली.

### 'मी सावित्री बोलते'

यशस्वी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, यशस्वी प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, यशस्वी इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये बालिका दिन व नववर्षानिमित्त आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रम प्रसंगी जर्मनीतील प्रसिद्ध उद्योजक क्रिस्टियन प्रेयन फ्लेक हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. महापालिकेचे विषय तज्ज्ञ विक्रम मोरे, विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष देवकाते, संस्थेचे सचिव डॉ.तुषार देवकाते, मोशी परिसरातील सामाजिक कार्यकर्ते सुरेश सूर्यवंशी उपस्थित होते. मुख्याध्यापिका शोभा देवकाते यांनी सर्व विद्यार्थ्यांना क्रांतिज्योती सावित्रीबाई यांच्या विषयी माहिती सांगितली. विद्यालयातील विद्यार्थिनी स्वराली लवटे, अंजली सूर्यवंशी, मायरा माने, गायत्री हरणे, मृणाली लवटे या विद्यार्थिनींनी बालिका दिनानिमित्त सावित्रीबाई फुले यांच्या विषयी माहिती सांगितली. तर श्रावणी मेटकर हिने 'मी सावित्री बोलते' या विषयावर एकांकिका सादर केली. याप्रसंगी आयोजित आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी विविध खाऊंचे स्टॉल मांडले. या माध्यमातून विद्यार्थ्यांना खरेदी विक्रीचा अनुभव देण्यात आला. पालकांनी विद्यार्थ्यांसोबत आनंद मेळाव्याचा आनंद घेतला.

### पिंपरीत अभिवादन

पिंपरीतील महात्मा फुले स्मारक येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मराठा सेवा संघाच्यावतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी संघाचे पिंपरी-चिंचवड शहर अध्यक्ष ॲड. लक्ष्मण रानवडे म्हणाले, "महिलांना वर्षानुवर्षे अधिकार नाकारण्यात आले होते. सावित्रीबाई फुले यांनी क्रांतिकारक पाऊल उचलून लावलेल्या शिक्षणाच्या रोपट्याचा वटवृक्ष झाल्याचे दिसत आहे." या कार्यक्रमास सुरेश इंगळे, सुभाष देसाई, सचिन दाभाडे, ॲड.सुनील रानवडे, दिलीप वाघ उपस्थित होते.

### बालिका दिवस उत्साहात

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त युनिक व्हिजन इंग्लिश मीडियम शाळेमध्ये विविध कार्यक्रम झाले. विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढून 'बेटी बचाओ, बेटी पढाओ', 'कन्या भ्रूणहत्या एक पाप है, मानव जाती के लिए अभिशाप है' अशा घोषणा देत जनजागृती केली. या कार्यक्रमासाठी संचालिका अश्विनी चिंचवडे, ऋषिकेश चिंचवडे, रजनी दुवेदी उपस्थित होते.

### दत्तक पालक योजना

नवी सांगवी येथील नवी प्राथमिक (टण्णू) शाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९३ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापिका लता सावळे व संजय मराठे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. जयंतीचे औचित्य साधून दत्तक पालक योजना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शाळेतील २१ गरजू विद्यार्थिनींना सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजनेअंतर्गत शाळेच्या शुल्क रुपी निधीचे वाटप करण्यात आले. मुख्याध्यापक, शिक्षक, पालक तसेच समाजातील दानशूर व्यक्तींनी त्यासाठी हातभार लावला. याप्रसंगी सुनील कोकाटे, शशिकांत नागणे, राजश्री पतंगे, वर्षा सोंडकर, संगीता कराते, उषा पोळ, मनीषा चांदिकर, सुनीता भिसे आदी उपस्थित होते. माधवी गुरव यांनी संयोजन केले. सुनील दरेकर यांनी सूत्रसंचालन केले. पूजा जमदाडे यांनी आभार मानले.

दिनांक ०४ जानेवारी २०२४



महेश किसनराव लांडगे
आमदार, भोसरी विधानसभा

महाराष्ट्र विधानसभा

विधान सभा
महाराष्ट्र

निवास : लांडगे आळी, महादेव मंदिराजवळ, भोसरीगांव, पुणे - ४११ ०३९. मोबा. : ९९२२६०९६६६
ऑफीस : शितलबाग कॉम्प्लेक्स, तुळजा भवानी मंदिरा मागे, पुणे-नाशिक रोड, भोसरी, पुणे -४११०३९. Website: www.maheshlandge.com

दिनांक : 04/ 09 /२०२४

जा.क्र. : ९४२४

शुभेच्छापत्र

मा. धम्मराज साळवे व सर्व पदाधिकारी .....

महाराष्ट्रातील कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, हे ध्येय बाळगून आपण 'रयत विद्यार्थी विचार मंच' संस्थेची २०१७ साली स्थापना केली. आपण छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा विद्यार्थी घडविण्यासाठी सतत प्रयत्नशील आहात.

आज अनेक विद्यार्थ्यांना परिस्थितीमुळे शिक्षण घेता येत नाही किंवा आर्थिक अडचणींमुळे शिक्षण सोडावे लागते अशा विद्यार्थ्यांना आपण संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक पाठबळ देण्याचे काम करत आहात.

'रयत विद्यार्थी विचार मंच' चा विस्तार संपूर्ण महाराष्ट्रभर होत आहे याचा मला अभिमान आहे. गरीब, गरजू विद्यार्थ्यांना आपण करत असलेले मदतकार्य उल्लेखनीय व कौतुकास्पद आहे. पुढील काळात देखील आपले हे कार्य अविरतपणे सुरू रहावे यासाठी हार्दिक शुभेच्छा !

आपला स्नेहांकित,

महेश किसनराव लांडगे


दिनांक ०४ जानेवारी २०२४

भोसरी विधानसभेचे आमदार मा.महेश दादा लांडगे यांनी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त संस्थेच्या कार्यास पत्राद्वारे शुभेच्छा दिल्या.....






Dr. Milind Ramchandra Bhandare
Member
Anikat Suresh Khatri
Member
Hon. Shantaram Dagadu Garade
Member
Hon. Prin. Dr. Hansraj Thorat
Member
Hon. Vishal Kaluram Masulkar
Member
Member
Member
Member
Member
Member Secretary






## दिनांक ०४ जानेवारी २०२४
## रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचा
## महात्मा फुले महाविद्यालयाबरोबर सामंजस्य करार(MOU)

रयत शिक्षण संस्थेचे महात्मा फुले महाविद्यालय पिंपरी पुणे यांच्याशी रयत विद्यार्थी विचार मंच महाराष्ट्र राज्य संस्थेशी सामंजस्य करार करण्यात आला.

या करारानुसार विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व शैक्षणिक प्रगतीसाठी महाविद्यालयात कला,साहित्य,विविध शैक्षणिक उपक्रम,विविध सांस्कृतिक कार्यक्रम महाविद्यालय व रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या संयुक्त विद्यमाने राबवले जातील..

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य व रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या.यावेळी प्रा.संग्राम गोसावी, प्रा.पांडुरंग भोसले,संतोष शिंदे,नीरज भालेराव,रोहित कांबळे आदी शिक्षक व पदाधिकारी उपस्थित होते...





दिनांक २६ जानेवारी २०२४

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भिमसृष्टी स्मारक पिंपरी या ठिकाणी प्रजासत्ताक दिनानिमित्त रयत विद्यार्थी विचार मंच,डिफेन्स फोर्स लीग. विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर व त्याग मूर्ती माता रमाई स्मारक समिती.बौद्ध समाज विकास महासंघ. बुद्ध लेण्या मुक्ती आंदोलन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने ध्वजारोहण व भारतीय संविधानाच्या प्रास्तविकेचे वाचन करण्यात आले.


सुस्वागतम्
रयत शिक्षण संस्थेचे
महात्मा फुले महाविद्यालय
पिंपरी वाघेरे पुणे - १७


महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी, पुणे – १७
मराठी विभाग आणि रयत विद्यार्थी विचार मंच, पिंपरी चिंचवड
' चित्रपट क्षेत्रातील करिअरच्या संधी' : कार्यशाळा









## दिनांक ०१ मार्च २०२४

## चित्रपट क्षेत्रातील करिअरच्या संधी कार्यशाळा

रयत विद्यार्थी विचार मंच व रयत शिक्षण संस्थेचे महात्मा फुले महाविद्यालय मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने चित्रपट क्षेत्रातील करिअरच्या संधी कार्यशाळा घेण्यात आली.





## दिनांक १९ फेब्रुवारी २०२४
## छत्रपती शिवाजी महाराज जयंती

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिम्मित एच. ए.येथील महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले.यावेळी संस्थेचे प्रदेश महासचिव संतोष शिंदे व व पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष मयूर जगताप,पश्चिम महाराष्ट्र सचिव समाधान गायकवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले...

**प्रभात** पुणे, मंगळवार, दि. २० फेब्रुवारी २०२४ || ३

# रयत विद्यार्थी विचार मंचतर्फे छत्रपतींना अभिवादन

**नेहरूनगर** - छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिम्मित रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने एच. ए. येथील महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे प्रदेश महासचिव संतोष शिंदे व पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष मयूर जगताप यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

या वेळी धम्मराज साळवे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वतंत्र, समता, बंधुता या तत्त्वावर आपले राज्य उभा केले. त्यांनी कधीही इतर धर्माचा द्वेष केला नाही.

आपल्याला आपला देश प्रगतीपथावर न्यायचा असेल तर आपल्याला देखील महाराजांच्या विचारांचा अंगिकार करणे गरजेचे आहे.

या वेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, प्रदेश महासचिव संतोष शिंदे, प्रदेश प्रवक्ते विक्रांत शेळके, पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष मयूर जगताप, पश्चिम महाराष्ट्र सचिव समाधान गायकवाड, प्रमोद लोंढे, शमशोदिनगाझी शेख, करण शिंदेउपस्थित होते.



**पिंपरी : छत्रपती शिवाजी महाराज यांना जयंतीनिमित्त अभिवादन करताना मान्यवर.**

# रयत विचारतर्फे अभिवादन

**पिंपरी :** रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त एच. ए. येथील महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन केले. यावेळी संस्थेचे प्रदेश महासचिव संतोष शिंदे, मयूर जगताप, धम्मराज साळवे, संतोष शिंदे, विक्रांत शेळके, पश्चिम महाराष्ट्र सचिव समाधान गायकवाड, प्रमोद लोंढे, शमशोद्दीन गाझी शेख, करण शिंदे आदी उपस्थित होते.

दिनांक २० फेब्रुवारी २०२४







## दिनांक २३ फेब्रुवारी २०२४

## RTE कायदा बचाव

RTE २००९ कायद्यात अत्यंत चुकीचे बदल करून या कायद्यातील बदलांमुळे लाखो गरीब मुलांचे शिक्षण अधांतरी झाले असून या कायद्यातील चुकीच्या बदलांना राज्यभर विरोध होत आहे.शिक्षण हक्क कायदा आरटीई पालक संघ पिंपरी चिंचवड शहर समिती यांच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर भीमसृष्टी स्मारक,पिंपरी या ठिकाणी RTE कायद्यातील चुकीच्या बदलांविरोधात व RTE कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी याकरिता आंदोलन करत आहेत.या आंदोलनास भेट देऊन रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या पाठिंबा देण्यात आला.







**दिनांक २८ फेब्रुवारी २०२४**
**मराठी राजभाषा दिन**

रयत विद्यार्थी विचार मंच व रयत शिक्षण संस्थेचे महात्मा फुले महाविद्यालय पिंपरी वाघेरे यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी राज्यभाषा दिन साजरा करण्यात आला.

न्यूज inbox

## 'रयत'मध्ये मराठी भाषा गौरव दिन

**पिंपरी :** येथील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा झाला. याचे आयोजन मराठी विभाग, ग्रंथालय विभाग आणि रयत विद्यार्थी विचार मंच यांच्या वतीने करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. विक्रांत शेळके आणि विशाल खोंदले उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. माधव सरोदे तर रयत विद्यार्थी मंचचे अध्यक्ष धम्मराज साळवे, शिक्षण विभाग पुणेचे माजी पर्यवेक्षीय अधिकारी आर.जी. जाधव, प्रा. अनिकेत खत्री आदी उपस्थित होते. विक्रांत शेळके यांनी कवितेची निर्मिती, कवितेची आस्वाद प्रक्रिया, कवितेचे विविध पैलू अशा विविध बाबींवर मार्गदर्शन केले. संतोष शिंदे यांनी आभार मानले तर प्रा. संग्राम गोसावी यांनी सूत्रसंचालन केले.

Scanned with CamScanner

# ‘कविता म्हणजे मानवी मनाचा पहिला हुंकार असतो’; महात्मा फुले महाविद्यालयात झाला मराठी भाषेचा गौरव



पिंपरी- आज २७ फेब्रुवारी कवी कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवसानिमित्ताने मराठी राजभाषा दिवस साजरा केला जातो. त्याच पार्श्वभूमीवर आज रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयात कवितेची निर्मिती, कवितेची आस्वाद प्रक्रिया, कवितेचे विविध पैलू या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रा.विक्रांत शेळके आणि विशाल खोंदले यांनी प्रमुख उपस्थिती लावली.

प्रा.विक्रांत शेळके यांनी आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानातून कवितेची निर्मिती, कवितेची आस्वाद प्रक्रिया, कवितेचे विविध पैलू अशा विविध बाबींवर मार्गदर्शन करत ' कविता म्हणजे मानवी मनाचा पहिला हुंकार असतो.' असे प्रतिपादन केले. आपल्या व्याख्यानातून त्यांनी कविता कशी घडते ते आपल्या स्वलिखित कवितांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसमोर उलगडून दाखविले. विशाल खोंदले यांनी विनोदी कवितेचे विश्व आपल्या स्वलिखित कवितांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या समोर उलगडून दाखवत सध्याच्या धावपळीच्या जगात विनोदी कवितेमुळे मानवी आयुष्य स्वच्छंदी कसे जगता येते याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

धम्मराज साळवे यांनी आपल्या मनोगतातून मराठी भाषा सध्याच्या काळात टिकवण्यासाठी आणि पुढे नेण्यासाठी सर्व मराठी भाषकांनी मराठी भाषेचा वापर आपल्या दैनंदिन जीवनात कशा प्रकारे केला पाहिजे याबद्दल मार्गदर्शन केले.

उपप्राचार्य डॉ.मृणालिनी शेखर यांनी आपली उत्स्फूर्त कविता सादर करीत कवी कुसुमाग्रजांच्या मराठी साहित्यसेवेचा आढावा आपल्या मनोगतातून मांडला. तर प्राचार्य प्रो.डॉ.माधव सरोदे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून मराठी भाषेचे इतर भाषांपेक्षा असलेले वेगळेपण सांगत सध्याच्या काळात मराठी भाषेच्या विकासासाठी आपण विशेष प्रयत्न केले पाहिजे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी शिक्षण विभाग पुणेचे माजी पर्यवेक्षीय अधिकारी आर.जी.जाधव, प्रा.अनिकेत खत्री, महाविद्यालयातील सर्व विद्याशाखांचे प्राध्यापक आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार संतोष शिंदे यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा.संग्राम गोसावी यांनी केले.

पिंपरी येथील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयात मराठी विभाग, ग्रंथालय विभाग आणि रयत विद्यार्थी विचार मंच यांच्या संयुक्त विद्यमाने कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त मराठी राजभाषा गौरव दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.विक्रांत शेळके आणि विशाल खोंदले उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.माधव सरोदे तर रयत विद्यार्थी मंचचे

अध्यक्ष मा.धम्मराज साळवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## दिनांक ०१ मार्च २०२४
## मराठी राजभाषा दिन

रयत विद्यार्थी विचार मंच व रयत शिक्षण संस्थेचे महात्मा फुले महाविद्यालय पिंपरी वाघेरे यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी राज्यभाषा दिन साजरा करण्यात आला.त्याची वृत्तपत्राने घेतलेली दखल

सकाळ

## महापुरुषांच्या प्रतिमा लावण्याची मागणी

**पिंपरी, ता. २९ :** पिंपरी-चिंचवड शहरातील सर्व शासकीय व खासगी शाळेत महापुरुषांच्या प्रतिमा लावणे अनिवार्य करण्याची मागणी करण्यात आली आहे. रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांच्यावतीने महापालिकेकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे. याबाबत अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे-पाटील यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, शहरात मोठ्या प्रमाणात शासकीय व खासगी शाळा आहेत. मात्र, आपला देश घडवण्यासाठी कोणी-कोणी आपले आयुष्य समर्पित केले. या सर्व गोष्टींची जाण विद्यार्थ्यांना होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना व तरुणांना काही ठराविक महापुरुष सोडले तर इतर महापुरुष कोण आहेत ? त्यांची नावे काय आहेत? त्यांच्या कार्याबाबत माहिती नसते. अशा विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासून आपल्या आदर्श महापुरुषांची ओळख होणे गरजेचे आहे.विद्यार्थी देखील यापासून अनभिज्ञ राहतात. शहरातील सर्व खासगी, शासकीय शाळांना परिपत्रक काढून सर्व महापुरुषांच्या प्रतिमा शाळेत लावण्याचे आदेश द्यावेत.

Pune, PCMC-Today
01/03/2024 Page No. 5

दिनांक ०१ मार्च २०२४






## दिनांक ०६ मार्च  २०२४
## इक्रा इंग्लिश मिडियम स्कुल वार्षिक स्नेहसंमेलन

इक्रा इंग्लिश मिडियम स्कुल दापोडी  वार्षिक स्नेहसंमेलन आचार्य अत्रे रंगमंदिर येथे पार पडला यावेळी रयत विद्यार्थी  विचार मंच संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

लोकमत

# पिंपरीत १४ एप्रिलला 'एक वही, एक पेन अभियान'

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांचा आदर्श घेत रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेतर्फे दरवर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त अनोखा उपक्रम राबविण्यात येतो. यानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार, फुले अर्पण करण्यापेक्षा वही, पेन व शैक्षणिक साहित्य अर्पण करून वैचारिक अभिवादन करावे, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले.

हे अभियान दरवर्षी राबविले जाते. यावर्षीही संस्थेतर्फे पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भीमसृष्टी स्मारक येथे १४ एप्रिल रोजी सकाळी नऊ वाजेपासून हे अभियान दिवसभर राबवण्यात येणार आहे. पिंपरी - चिंचवड शहरातील आंबेडकरी अनुयायांनी जयंतीदिनी बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी येताना हार, फुले न आणता वही, पेन, शैक्षणिक साहित्य अर्पण करून वैचारिक अभिवादन करावे, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले.

Hello Pimpri Chinchwad
Page No. 3 Apr 01, 2024
Powered by: erelego.com

## ■ १४ एप्रिलला 'एक वही, एक पेन अभियान'

**पिंपरी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांचा आदर्श घेत रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेतर्फे दरवर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त अनोखा उपक्रम राबविण्यात येतो. यानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार, फुले अर्पण करण्यापेक्षा वही, पेन व शैक्षणिक साहित्य अर्पण करून वैचारिक अभिवादन करावे, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले. हे अभियान दरवर्षी राबविले जाते. यावर्षीही संस्थेतर्फे पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भीमसृष्टी स्मारक येथे १४ एप्रिल रोजी सकाळी नऊ वाजेपासून हे अभियान दिवसभर राबवण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील आंबेडकरी अनुयायांनी जयंतीदिनी बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी येताना हार, फुले न आणता वही, पेन, शैक्षणिक साहित्य अर्पण करून वैचारिक अभिवादन करावे, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले.

**पुण्यनगरी**

# एक वही, एक पेन अभियान राबविणार

**पिंपरी :** रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार, फुले अर्पण करण्यापेक्षा वही, पेन व शैक्षणिक साहित्य अर्पण करून वैचारिक अभिवादन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

यावर्षी देखील संस्थेच्या वतीने पिंपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भीमसृष्टी स्मारक पिंपरी येथे १४ एप्रिल रोजी दिवसभर हे अभियान राबवण्यात येणार आहे. पिंपरी चिंचवड शहरातील सर्व आंबेडकरी अनुयायांनी जयंतीदिनी बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी येताना शैक्षणिक साहित्य आणावे. हे शैक्षणिक साहित्य महाराष्ट्रातील गरजू विद्यार्थ्यांना मोफत दिले जाणार आहे, असे संस्थेचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी सांगितले.

Smart Pimpri Chinchwad Edition
Apr 2, 2024 Page No. 02
Powered by: erelego.com

पिंपरी-चिंचवड

## पिंपरी-चिंचवड

## अवतीभवती

# शालेय साहित्य अर्पण करण्याचे आवाहन

**पिंपरी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार फुले अर्पण करण्याऐवजी वही, पेन व शैक्षणिक साहित्य अर्पण करून वैचारिक अभिवादन करावे, असे आवाहन रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही संस्थेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर भीमसृष्टी स्मारक येथे सकाळी नऊपासून हे अभियान राबविण्यात येणार आहे. जयंतीदिनी आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी येताना हार फुले न आणता वही, पेन, शैक्षणिक साहित्य अर्पण करावे, असे आवाहन मंचचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी केले आहे. हे साहित्य गरजूंना दिले जाणार आहे.

**दिनांक १ एप्रिल २०२४**

**एक वही एक पेन अभियान २०२४**

पिंपरी चिंचवड शहरात १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिम्मित एक वही एक पेन अभियान राबवण्यात येणार आहे याबाबत समाजबांधवांना आवाहन करण्यात आले होते त्याची वृत्तपत्रांनी घेतलेली दखल


एक पेन
संकलन


एक पेन
संकलन


डॉ.बाबासाहेब आंबेडकर
यांच्या जयंती दिनानिमित्त
एक वही
Ramatritiyapanthi







**दिनांक १४ एप्रिल २०२४**

**एक वही एक पेन अभियान**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिम्मित पिंपरी भिमसृष्टी येथे एक वही एक पेन अभियान राबवण्यात आले..

प्रभात

## पिंपरी-चिंचवड



# एक वही एक पेन उपक्रमाला अनुयायांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पिंपरी, दि. १५ (प्रतिनिधी)** - डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने एक वही एक पेन संकलन व रोपे वाटप असा अनोखा उपक्रम राबविला. रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, राज्य समन्वयक श्वेता साळवे, प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांच्या हस्ते भीमसृष्टी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून या उपक्रमास सुरुवात करण्यात आली.

या उपक्रमात अनेक अनुयायांनी सहभाग दर्शवत संस्थेकडे वही पेन सुपूर्द केले. या उपक्रमात सहभागी होणाऱ्या नागरिकांना रोप वाटप करत सन्मानीत करण्यात आले. या उपक्रमात महापालिका अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांनी उपस्थिती लावून उपक्रमास सदिच्छा व्यक्त केल्या. रयत विद्यार्थी विचार मंच संस्था दरवर्षी हा उपक्रम राबवत असते. या उपक्रमाच्या माध्यमातून जमा होणारे शैक्षणिक साहित्य शहरातील गरजू विद्यार्थी तसेच इतर ठिकाणच्या आश्रम शाळांना पुरवले जाते. यावेळी प्रदेश महासचिव संतोष शिंदे, शहराध्यक्ष अभिषेक चक्रनारायण, भाग्यश्री आखाडे, माधवी खरात, योगेश कांबळे, अजय चक्रनारायण, अतुल वाघमारे, विक्रांत शेळके, अभिजित लगाडे, प्रणाली कावरे, सिद्धार्थ सूर्यवंशी आदी उपस्थित होते .

PimpriChinchwad, 16 Apr 2024, Page:005
https://epaper.dainikprabhat.com

लोकमत



उपक्रमात सहभागी झालेले भारतीय बौद्धजन विकास समितीतील सदस्य.

# 'एक वही अन् एक पेन' अभियानातून भीमवंदना

## दुर्गम भागात साहित्य पोहोचविले जाणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी पिंपरी चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ लाखो अनुयायी येत असतात. बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार, पुष्पचक्र वाहून अभिवादन केले जाते. मात्र, बाबासाहेबांनी दिलेली शिकवण स्वतःमध्ये रुजवणे हे त्यांना खरे अभिवादन ठरेल, ही भावना मनामध्ये बाळगून भारतीय बौद्धजन विकास समिती आणि रयत विद्यार्थी विचार मंच यांच्यामार्फत 'एक वही एक पेन' संकलन अभियान राबविण्यात आले.

या अभियानातून जमा झालेले शालेय साहित्य हे शहरातील झोपडपट्टी भागातील मुलांसोबतच महाराष्ट्रातील दुर्गम भागात असणारे अनाथाश्रम, ऊसतोड कामगारांची मुले, जिल्हा परिषद शाळेतील मुलांपर्यंत पोहोचवले जाते. यामुळे 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा डॉ. बाबासाहेबांनी दिलेला संदेश साध्य होतो.

शहरात डॉ. आंबेडकर जयंतनीनिमित्त अनेक सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रम राबविले जातात. अनेक ठिकाणी मनोरंजनपर कार्यक्रम पार पडतात. मात्र अनोखा असा शैक्षणिक उपक्रम राबवून या दोन संस्थांतर्फे समाजासमोर आदर्श मांडण्याचा प्रयत्न केला गेला. त्यांच्या उपक्रमांचे कौतुक होत आहे.

### काय आहे 'एक वही एक पेन' अभियान..?

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' हा संदेश दिला. त्यानुसार आज मोठ्या प्रमाणात तळागाळातील लोक शिक्षित झाले. मात्र, आजही दुर्गम भागातील अनेक मुला-मुलींना, तरुण-तरुणींना शिक्षण घेता येत नाही. गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी या उपक्रमामार्फत प्रयत्न केले.

प्रत्येकवर्षी एक वही, एक पेन दान करण्याचे आवाहन आम्ही करतो. यातून संकलित झालेले साहित्य हे महाराष्ट्रातील शिक्षणापासून वंचित मुलांपर्यंत पोहोचवले जाते. आत्तापर्यंत एक लाखांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळाला आहे.

**- प्रमोद गायकवाड,**
**भारतीय बौद्धजन विकास समिती**

गेल्या चार वर्षांपासून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येकवर्षी साधारण साडेपाचशे डझनहून अधिक वह्यांचे संकलन केले जाते. झोपडपट्टी भागातील कामगारांच्या मुलांना या साहित्याचे वितरण केले जाते. नैसर्गिक आपत्ती आलेल्या भागातील मुलांनादेखील या उपक्रमातून संकलित केलेले साहित्य वितरित केले जाते.

**- संतोष शिंदे,**
**रयत विद्यार्थी विचार मंच**

Hello Pimpri Chinchwad
Page No. 5 Apr 16, 2024
Powered by: erelego.com





दिनांक ०९ मे २०२४

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या स्मृतिदिन निमित्त रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने अभिवादन करण्यात आले.




## दिनांक ३१ मे २०२४

## पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त मोरवाडी पिंपरी येथील पुतळयाला संस्थेचे प्रदेश महासचिव संतोष शिंदे व पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष मयूर जगताप यांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले.

यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे,महासचिव संतोष शिंदे,पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष मयूर जगताप,प्रल्हाद साबळे तसेच अनेक पदाधिकारी उपस्थित होतें.

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
Pimpri Chinchwad Edition_01 June 2024_013
01 Jun 2024
www.dainikprabhat.com

# अहिल्यादेवी होळकर यांना विविध संघटनांकडून अभिवादन



मोरवाडी : राजमाता अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन करताना आरपीआयचे पदाधिकारी.

**पिंपरी, दि. ३१ (प्रतिनिधी)** - राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त शहरातील विविध संस्था, संघटना व राजकीय पक्षांच्या वतीने अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन करण्यात आले.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटच्या पिंपरी चिंचवड शहरच्या वतीने राजमाता अहिल्यादेवी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष कुणाल वाव्हळकर, महिला अध्यक्षा कमल कांबळे, अमोल वारभुवन, चिंचवड विधानसभेचे युवक अध्यक्ष स्वप्निल कसबे, बापू सरोदे आदी उपस्थित होते.

राष्ट्रीय अल्पसंख्याक महासंघाच्या वतीने संस्थापक अध्यक्ष रफिक कुरेशी यांनी अहिल्यादेवी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. यावेळी पक्षाचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने प्रदेश महासचिव संतोष शिंदे व पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष मयूर जगताप यांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले.

या वेळी संस्थेचे महासचिव संतोष शिंदे यांनी जयंतीनिमित्त असे मनोगत व्यक्त केले की अहिल्यादेवी एक अतिशय योग्य शासक व संघटक होत्या. मध्य भारताच्या इंदूरमधील त्यांचा राज्यकाळ सुमारे तीस वर्षे चालला. हा एक स्वप्नवत काळ होता. या काळात कायद्याचे राज्य होते आणि त्यामुळे त्या काळात जनतेची भरभराट झाली. अहिल्यादेवी होळकरांना जीवनकालात तर सन्मान मिळालाच पण मृत्यूनंतरही लोकांनी त्यांना संताचा दर्जा दिला. या वेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, महासचिव संतोष शिंदे, मयूर गायकवाड, प्रल्हाद कांबळे तसेच अनेक पदाधिकारी उपस्थित होते.



सिटी प्लस मराठी

Digital

शुक्रवार ३१ मे २०२४ | CITY PLUS मराठी | बातमी साठी संपर्क- 9764656990

## रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन.

संस्थेचे प्रदेश महासचिव संतोष शिंदे व पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष मयूर जगताप यांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले.

गणेश मोरे ✍

पिंपरी | रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त मोरवाडी पिंपरी येथील पुतळ्याला संस्थेचे प्रदेश महासचिव संतोष शिंदे व पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष मयूर जगताप यांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले.

यावेळी संस्थेचे महासचिव संतोष शिंदे यांनी जयंतीनिमित्त असे मनोगत व्यक्त केले की अहिल्यादेवी एक अतिशय योग्य शासक व संघटक होत्या. मध्य भारताच्या इंदूरमधील त्याचा राज्यकाळ सुमारे तीस वर्षे चालला. हा एक स्वप्नवत काळ होता. या काळात कायद्याचे राज्य होते आणि त्यामुळे त्या काळात जनतेची भरभराट झाली. अहिल्यादेवी होळकरांना जीवनकालात तर सन्मान मिळालाच पण मृत्यूनंतरही लोकांनी त्यांना संताचा दर्जा दिला

यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे,महासचिव संतोष शिंदे,पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष मयूर गायकवाड,प्रल्हाद कांबळे तसेच अनेक पदाधिकारी उपस्थित होतें.



## रयत विद्यार्थी विचार मंचातर्फे पुण्यश्लोकअहिल्याबाई होळकर जयंतीनिमित्त अभिवादन

विचार तरंग: रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त मोरवाडी पिंपरी येथील पुतळ्याला संस्थेचे प्रदेश महासचिव संतोष शिंदे व पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष मयूर जगताप यांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे महासचिव संतोष शिंदे यांनी जयंतीनिमित्त असे मनोगत व्यक्त केले की अहिल्यादेवी एक अतिशय योग्य शासक व संघटक होत्या. मध्य भारताच्या इंदूरमधील त्याचा राज्यकाळ सुमारे तीस वर्षे चालला. हा एक स्वप्नवत काळ होता. या काळात कायद्याचे राज्य होते आणि त्यामुळे त्या काळात जनतेची भरभराट झाली. अहिल्यादेवी होळकरांना जीवनकालात तर सन्मान मिळालाच पण मृत्यूनंतरही लोकांनी त्यांना संताचा दर्जा दिला यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे,महासचिव संतोष शिंदे,पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष मयूर गायकवाड,प्रल्हाद कांबळे तसेच अनेक पदाधिकारी उपस्थित होतें.

सकाळ

# एकाच तारखेला 'दोन' परीक्षा

## विधीचे विद्यार्थी 'सीएस'ची परीक्षा मुकण्याची भीती

पिंपरी, ता. ३० : केंद्र सरकारच्या भारतीय कंपनी सचिव संस्था (आईसीएसआई) आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परीक्षांचे हॉल तिकिटे विद्यार्थ्यांना उपलब्ध झाली असून त्यामध्ये काही विद्यार्थ्यांच्या दोन्ही परीक्षा एकाच दिवशी म्हणजे २ मेला होणार आहेत. त्यामुळे, विधी आणि कंपनी सेक्रेटरी (सीएस) च्या विद्यार्थ्यांना कोणत्याही एका परीक्षेला मुकावे लागणार आहे. परिणामी, परीक्षेची तारीख बदलण्याची मागणी विद्यार्थ्यांनी पुणे विद्यापीठाच्या परीक्षा कक्षाकडे केली आहे.

कंपनी सेक्रेटरी (सीएस) या विषयांसाठी होणारी परीक्षा २ ते १० जून २०२४ या कालावधीत आयोजित केली आहे. आईसीएसआईकडून दर सहा महिन्यांनी ही परीक्षा होते. देशभरातील हजारो विद्यार्थी आणि पालकांनी २ जून रोजी होणाऱ्या कंपनी सेक्रेटरी प्रवेश परीक्षा देण्याकरिता अर्ज केले आहेत. आता २ जून रोजी कंपनी सेक्रेटरी परीक्षा घेण्यात येणार आहे. तर ४ ते १३ जून २०२४ त्याच दिवशी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षाही आहेत. त्यामुळे, विधीच्या विद्यार्थ्यांना कोणत्याही एका परीक्षेची संधी गमवावी लागणार आहे. विद्यार्थ्यांनी केलेली अभ्यासाची मेहनत, अमूल्य वेळ, परीक्षा शुल्क, श्रम आणि महत्त्वाचे म्हणजे करिअरची संधी गमावण्याचा धोका निर्माण झाला आहे.

### ४ जूनची परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी

**विधी (लॉ) च्या तिसऱ्या वर्षाच्या चौथ्या सत्राच्या परीक्षेचा पहिला पेपर ४ जून २०२४ रोजी आहे. परंतु या दिवशी लोकसभा निवडणूक २०२४ ची मतमोजणी असल्याने या कामकाजासाठी अनेक शासकीय कर्मचारी, पदाधिकारी, कर्मचारी यांची नेमणूक असणार आहे. अनेक शासकीय अधिकारी व कर्मचारी की, जे 'लॉ' चा कोर्स करीत आहे. अशा बहुतांशी अधिकारी व कर्मचारी यांची ४ जून रोजी मतमोजणी कामकाजासाठी नेमणूक असण्याची शक्यता आहे. तरी पहिला पेपर पुढे ढकलण्यात यावा. किंवा अन्य दिवशी परीक्षा घ्यावी, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंचचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी विद्यापीठ कुलगुरू आणि परीक्षा विभाग प्रमुखांकडे केली आहे.**

"

वेळापत्रकानुसार ४ ते १३ जून २०२४ या कालावधीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा आहेत. या परीक्षांमध्ये बदल करण्यात येऊ शकतो. तसे झाल्यास हजारो विद्यार्थ्यांना करिअर आणि शैक्षणिक संधी प्राप्त होईल.
**- अथर्व पाटील,** भोसरी,
यशवंतराव चव्हाण विधी महाविद्यालय

आईसीएसआई संस्थेची सकाळी ९ ते १२ आणि पुणे विद्यापीठाची सकाळी १० ते दुपारी १ यावेळेत परीक्षा आहे. त्यामुळे वेळेचे नियोजन अशक्य आहे.
**- जुही अपार,**
मराठवाडा मित्र मंडळ महाविद्यालय

विद्यापीठाने परीक्षेची वैयक्तिक कारणास्तव तारीख बदलण्याचा पर्याय विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावा. विधी शाखेचे अनेक विद्यार्थी कंपनी सेक्रेटरीची परीक्षा देत असतात. **- अनिश काळभोर,**
अध्यक्ष, राज्य विद्यार्थी संघटना

Pune, Main
31/05/2024 Page No. 2

**दिनांक ३१ मे २०२४**






## दिनांक ०२ जून २०२४

टाटा स्ट्राईव आणि लाईट हाऊस या संस्था प्रतिनिधी बरोबर काही प्रोजेक्ट तसेच १० वी पास नापास विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी या विषयासंदर्भात चर्चा झाली

सदर चर्चेमध्ये संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे,प्रदेश महासचिव संतोष शिंदे, सचिव प्रगती कोपरे,पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष मयूर जगताप,शहराध्यक्ष अभिषेक चक्रनारायण, अभिजित लगाडे, माधवी खरात,सागर गायकवाड सहभागी होते.



## दिनांक ०५ जून २०२४
## गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत

मुंबई महाराष्ट्रातील आंबेडकरी युवकांच्या वतीने राजर्षी शाहू महाराज यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त राजर्षी विद्यार्थी मेळावा घाटकोपर मुंबई या ठिकाणीं दिनांक ०८ जून २०२४ रोजी आयोजित करण्यात आला आहे. १५० व्या जयंतीचे औचित्य साधून या टीमच्या वतीने १५० गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे. सदर उपक्रमास शैक्षणिक साहित्याची मदत मिळावी अशी या टीमच्या वतीने विनंती करण्यात आली होती. सदर विनंतीनुसार रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने ४५ गरजू विद्यार्थांच्या शैक्षणिक साहित्याची मदत जयाताई बनसोडे यांच्याकडे सुपूर्त करण्यात आली.






दिनांक ०९ जुन २०२४

घाटकोपर, रमाबाई आंबेडकर नगर या ठिकाणी मुंबई व महाराष्ट्रातील युवक यांच्या वतीने राजर्षी शाहू महाराज यांच्या १५० व्या जयंतीनिम्मित १५० गरजू विद्यार्थ्यांना संपूर्ण शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.या उपक्रमाकरिता रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने ४५ विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी शैक्षणिक साहित्य देण्यात आले होते.याबद्दल विकी भाऊ शिनगारे यांच्या टीमच्या वतीने रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे राज्य उपाध्यक्ष सोमनाथ पाटील,प्रदेश महासचिव संतोष शिंदे,राज्य सल्लागार अमर मुनेश्वर यांचा सन्मान करण्यात आला..


वार सोमवार
विषय
Best of Luck Kit




आपले पदाधिकारी
Best of Luck Kit
NATARAJ






## दिनांक २४ जून २०२४

## गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत

पुणे जिल्यातील मावळ तालुक्यातील कचरेवाडी व कारंजगांव पठार येथील या दुर्गम भागातील २ जिल्हा परिषदेच्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना ७५०० रुपये किंमतीचे वह्या व स्टेशनरी साहित्य देण्यात आले.

शबनम न्युज

Breaking News ज्य पक्षाच्या पिंपरी चिंचवड शहराध्यक्षपदी विजय जरे यां

Home › Breaking News › रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने मावळ तालुक्यातील दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

Breaking News | ताज्या घडामोडी | महाराष्ट्र | मावळ | शहर

# रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने मावळ तालुक्यातील दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

by shabnamnews June 25, 2024 0

SHARE 1



**शबनम न्युज | मावळ**

**रयत विद्यार्थी विचार मंचच्या माध्यमातून मावळ तालुक्यातील दुर्गम भागातील कचरेवाडी व करंजगाव पठार येथील जिल्हा परिषदेच्या दोन शाळेतील विद्यार्थ्यांसाठी वह्या व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी रयत विद्यार्थी विचार मंचचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, संस्थेचे महासचिव संतोष शिंदे, तालुका महासचिव प्रा. विक्रांत शेळके तसेच शाळेच्या शिक्षक, शिक्षिका आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.**

**यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका मा. शिल्पा बडगुजर यांनी सर्वांचे स्वागत करत विद्यार्थ्यांना संस्था व सर्व पदाधिकार्यांची ओळख करून दिली. मावळ तालुक्यातील कचरेवाडी व करंजगाव पठार येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य साठी मदतीची मागणी शाळेच्या वतीने रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेकडे करण्यात आली होती. त्यानुसार जवळपास 7500 रु किमतीचे शैक्षणिक साहित्य शाळेकडे सुपूर्द करण्यात आले.**

Advertisement

# PCMC : रयत विद्यार्थी विचार मंचची दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना मदत

25 June 2024




**पिंपरी चिंचवड / क्रांतीकुमार कडुलकर** : मावळ तालुक्यातील कचरेवाडी व करंजगाव पठार येथील जिल्हा परिषदेच्या 2 शाळेतील विद्यार्थ्यांसाठी वह्या व इतर स्टेशनरी साठी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेकडे शाळेच्या वतीने मदत करण्याची विनंती केली होती. त्यानुसार जवळपास 7500 /- रुपये किमतीचे शैक्षणिक साहित्य शाळेकडे सुपूर्द केले. PCMC

यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका शिल्पा बडगुजर यांनी सर्वांचे स्वागत करत विद्यार्थ्यांना संस्था व सर्व पदाधिकार्यांची ओळख करून दिली. रयत विद्यार्थी विचार मंचाचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण घेण्याबरोबरच संस्था त्यांच्या समवेत शैक्षणिक मदतीसाठी सोबत असल्याचे आश्वासन दिले. pcmc

संस्थेचे महासचिव संतोष शिंदे यांनी रयत विद्यार्थी विचार मंचाची भूमिका मांडली. राज्य संपर्क प्रमुख/ मावळ तालुका अध्यक्ष अतुल वाघमारे यांनी संस्थेची संकल्पना मांडताना विद्यार्थ्यांना देखील मोठे होऊन अशीच समाजाशी नाळ जोडण्यासाठी आवाहन केले. pcmc

मावळ तालुका महासचिव प्रा. विक्रांत शेळके यांनी मुलांशी मोकळ्या भाषेत संवाद साधत मुलांना हसवून त्यांना शिक्षण, करिअर , अभ्यास, खेळ या सर्वांना समान महत्व देत आयुष्य जगण्याविषयी मार्गदर्शन केले. मावळ तालुका उपाध्यक्ष सागर गायकवाड यांनी आभार मानले.

दिनांक २५ जुन २०२४






दिनांक २७ जून २०२४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त ३ मा. उल्हास जगताप साहेब यांच्या प्रशासकीय सेवेचा काळ संपल्याने त्यांनी त्यांच्या प्रशासकीय काळात केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल शॉल व भारतीय संविधानाची प्रास्ताविका देऊन सन्मान करण्यात आला.





**उल्हास बबनराव जगताप**
अतिरिक्त आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

दिनांक :- २४/०६/२०२४

शुभेच्छापत्र

मा. धम्मराज साळवे व सर्व पदाधिकारी .....

आज अनेक विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना प्रचंड अडचणी येतात, परिस्थितीमुळे शिक्षण घेता येत नाही किंवा आर्थिक अडचणींमुळे शिक्षण सोडावे लागते अशा विद्यार्थ्यांना संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक पाठबळ देण्याचे तसेच त्यांच्या समस्या सोडविण्याचे काम गेली अनेक वर्ष आपण करत आहात.

आपल्या संस्थेमध्ये सर्व तरुण विद्यार्थी एकत्र येऊन स्वतःबरोबर समाजाचे देखील हित झाले पाहिजे ही भावना घेऊन आपण शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी जे काम करत आहेत ते अभिमानास्पद आहे.

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या अनेक कार्यक्रमांना मला प्रमुख मार्गदर्शक/पाहुणे म्हणून उपस्थित राहण्याची संधी भेटली. आपण छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील अश्या महामानवांच्या विचारांचा वसा व वारसा खऱ्या अर्थाने चालवत आहात.

'रयत विद्यार्थी विचार मंच' संस्थेचा विस्तार संपूर्ण महाराष्ट्रभर होत आहे याचा मला अभिमान आहे. गरीब, गरजू विद्यार्थ्यांना आपण करत असलेले मदतकार्य उल्लेखनीय व कौतुकास्पद आहे. पुढील काळात देखील आपले हे कार्य अविरतपणे सुरू रहावे यासाठी हार्दिक शुभेच्छा !

आपला,

(उल्हास बबनराव जगताप)
अतिरिक्त आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८

कार्यालय : ३ रा मजला, मुख्य इमारत, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मुंबई-पुणे रस्ता, पिंपरी, पुणे – ४११ ०१८.
कार्यालय : ०२०-६७३३१३१३, ०२०-६७३३१३१४ निवास : ०२०-२७४५७५६० मोबाईल : ९९२२५०१२५५
Email : addcom-3@pcmcindia.gov.in / u.jagtap@pcmcindia.gov.in

**दिनांक २७ जून २०२४**
**संस्थेच्या कार्यास शुभेच्छा**


पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त ३ मा. उल्हास जगताप साहेब यांनी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या कार्याचे कौतुक करत शुभेच्छा पत्र दिले.






दिनांक १२ जुलै २०२४

कोल्हापूर जिल्ह्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत तारदाळ या गावातील गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी जागा कमी पडत असल्याने नवीन अंगणवाडीचे रखडलेले काम वारंवार सूचना करून ही  पूर्ण होत नसल्याने रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे कोल्हापूर जिल्हाध्यक्ष मा.सुमित साटम हे ग्रामपंचायत कार्यालयासमोर उपोषणाला बसले होते.तारदाळ ग्रामपंचायत च्या सरपंच यांनी उपोषणाला भेट देऊन लेखी आश्वासन दिले की पुढील १५ दिवसात रखडलेले काम पूर्ण करण्यात येईल...



ग्रामपंचायत तारदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

email id- gptardal@gmail.com

दिनांक :- १२/०७/२०२४

प्रति,

रयत विद्यार्थी विचार मंच,
महाराष्ट्र राज्य.

विषय :- उपोषण मागे घेणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविणेत येते कि, आपल्या रयत विद्यार्थी विचार मंच मार्फत आज पासून तारदाळ संगमनगर मधील अंगणवाडी क्रमांक २०८ या इमारतीचे रखडलेले काम त्वरित पुर्ण करणेसाठी ग्रामपंचायत समोर उपोषण चालू केले आहे. तरी ग्रामपंचायती कडून तात्काळ पाठपुरावा करून १५ दिवसाच्या आत सदर अंगणवाडी क्रमांक २०८ चे रखडलेले काम पुर्ण करण्यात येईल. तरी आपलेकडून चालू असलेले उपोषण मागे घ्यावे.

सरपंच
ग्रामपंचायत तारदाळ
ता.हातकणंगले,जि.कोल्हापूर

# तारदाळमधील अंगणवाडीचे काम पूर्ण करा

## ग्रामपंचायतसमोर लाक्षणिक उपोषण



**तारदाळ/महान कार्य वृत्तसेवा**

येथील संगमनगर परिसरात असणाऱ्या अंगणवाडीचे रखडलेले काम त्वरित पूर्ण करा या मागणीसाठी रयत विद्यार्थी विचार मंचचे सुमित साटम यांनी तारदाळ ग्रामपंचायतीसमोर एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण केले.

तारदाळ येथील संगमनगर मधील अंगणवाडी क्रमांक २०८ या इमारतीचे काम सुरू होऊन दोन वर्षे उलटून गेली तरीही अद्यापही काम पूर्ण झालेले नाही. या अंगणवाडीचे रखडलेले काम त्वरित पूर्ण करावे, या मागणीचे निवेदन काही दिवसापूर्वी तारदाळ ग्रामपंचायतीला दिले होते.परंतु ग्रामपंचायतीने याकडे दुर्लक्ष केल्याने शुक्रवारी साटम यांनी तारदाळ ग्रामपंचायतसमोर एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण सुरू केले. यावेळी सरपंच पल्लवी पवार यांनी येत्या पंधरा दिवसात सदरचे काम पूर्ण करू, असे लेखी आश्वासन दिले. यावेळी उपोषणकर्ते यांनी आपले उपोषण मागे घेतले. रखडलेले काम ग्रामपंचायत फंडातून पूर्ण करणार असल्याचे सरपंच पवार यांनी सांगितले. यावेळी सचिन पवार, चंद्रकांत तांबवे ,रणजीत पवार ,प्रमोद परीट, विजय चौगुले, नयन कांबळे आदी उपस्थित होते.



# तारदाळ येथे अंगणवाडीचे रखडलेले बांधकाम पूर्ण करण्याच्या मागणीसाठी लाक्षणिक उपोषण

**तारदाळ/प्रतिनिधी–**

तारदाळ येथील सगंमनगर परिसरातील अंगणवाडी क्रं २०८ या इमारतीचे बांधकाम गेली दोन वर्ष रखडले आहे. त्यामुळे अंगणवाडी मधील बालकांना भाडयाच्या खोलीमध्ये अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. रखडलेले काम सुरु करावे या मागणीसाठी रयत विद्यार्थी विचार मंचचे कोल्हापूर जिल्हा प्रमुख सुमीत साटम यांनी शुक्रवारी तारदाळ ग्रामपंचायतीसमोर लाक्षणिक उपोषण सुरू केले होते. यावेळी सरपंच पल्लवी पोवार व रणजीत पोवार यांनी १५ दिवसात इमारतीचे बांधकाम  पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिल्याने साटम यांनी उपोषण मागे घेतले.

अंगणवाडी इमारतीचे बांधकाम गेली दोन वर्ष रखडले आहे. त्यामुळे खाजगी जागेत अंगणवाडी शाळा भरवली जात होती. मात्र गेली दोन वर्ष लहान बालकांना जागा अपुरी पडत असल्याने बालकांची प्रंचड गैरसोय होत होती. दोन वर्ष ग्रामपंचायतीकडे पाठपुरावा करूनही दुर्लक्ष करण्यात आल्याने, ग्रामपंचातीचे लक्ष वेधण्यासाठी रयत विद्यार्थी मंचच्या वतीने ग्रामपंचायती समोर उपोषणास सुरुवात केली. सदर उपोषणाची दखल घेत सरपंच पोवार यांनी रखडलेले इमारतीचे काम १५ दिवसांत पुर्ण करुन देण्याचे लेखी आश्वासन दिल्याने उपोषण मागे घेण्यात आले. सदरील अंगणवाडी इमारतीचे काम मार्गी लागल्याने परिसरातून समाधान व्यक्त होत आहे.



# अंगणवाडिचे थांबलेले काम पूर्ण करण्यासाठी लाक्षणिक उपोषण

## लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे

**तारदाळ : प्रतिनिधी–**

येथील संगम नगरमधील अंगणवाडी क्रमांक २०८ या इमारतीचे मागील दोन वर्षे पासून काम अर्धवट अवस्थेत आहे. येथे शिक्षणासाठी येत असलेला आजूबाजूच्या परिसरातील लहान मुलांना बसण्यासाठी जागा अपुरी पडल्यामुळे त्यांची कुचंबना होत आहे. अंगणवाडी ही शिक्षणाचा मूळ पाया आहे. याचा विचार करून राहिलेले काम लवकरात लवकर पूर्ण करून विद्यार्थ्यांना या दहा दिवसात अंगणवाडी खुले करण्यात यावे अन्यथा ग्रामपंचायत समोर उपोषणाला बसण्यात येईल असे निवेदन रयत विद्यार्थी विचार मंच महाराष्ट्र राज्य कोल्हापूर जिल्हाप्रमुख सुमित साठे यांनी तारदाळ ग्रामपंचायत यांना देण्यात आले होते. ग्रामपंचायत कडून कामाबाबत कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे ग्रामपंचायत समोर सुमित साटम, अश्विन मठपती हे उपोषणाला बसले होते. यावेळी संगमनगर मधील भागातील व तारदाळमधील ग्रामस्थांनी या उपोषणास पाठिंबा दिला. उपोषणस्थळी सरपंच पल्लवी पवार, ग्रा. पं. सदस्य नयन कांबळे, चंद्रकांत तांबवे, पोलीस पाटील संतोष लोहार यांनी उपोषणकर्त्याशी चर्चा करून येत्या पंधरा दिवसात ग्रामपंचायत तर्फे सदर अंगणवाडीची रखडलेली कामे पूर्ण करण्यात येतील असे लेखी पत्र देऊन उपोषण मागे घेण्याची विनंती करण्यात आली. त्यानंतर उपोषणकर्ते सुमित साटम यांनी येत्या पंधरा दिवसात ग्रामपंचायतीने पूर्ण काम करतील अशी अपेक्षा व्यक्त करून आपले उपोषण मागे घेतले.

दिनांक १३ जुलै २०२४








## दिनांक १५ जुलै २०२४
## प्रमाणपत्र वाटप समारंभ

टाटा स्ट्राइव ,SKF कंपनी येथे प्रमाणपत्र वाटप समारंभात प्रमुख उपस्थिती रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे ,प्रदेश महासचिव संतोष शिंदे यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व सन्मानित करण्याचा मान मिळाला..







दिनांक १८ जुलै २०२४

महाराष्ट्राचे लोकप्रिय पत्रकार मा.राहुल कुलकर्णी सर यांची भेट झाली.राहुल सर अतिशय जनसामान्यांच्या भाषेत वार्तांकन करत असतात.त्याबद्दल त्यांचे कौतुक केले.तसेच या वेळी त्यांनी देखील आम्ही करत असलेल्या सामाजिक कार्याची माहिती जाणून घेतली...










## दिनांक २१ जुलै २०२४
## मोफत डोळे तपासणी व मार्गदर्शन शिबिर
## रयत_विद्यार्थी_विचार मंच कोल्हापूर_जिल्हा

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे कोल्हापूर जिल्हाध्यक्ष सुमित साटम यांच्या माध्यमातून आज सांगली नाका इचलकरंजी येथे नागरिकांसाठी मोफत डोळे तपासणी व मार्गदर्शन शिबिर राबवले यामध्ये मोठ्या प्रमाणात गरजू व्यक्तींनी सहभाग दर्शविला....

# पुण्य नगरी

## पूरग्रस्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याची मदत करा

**रयत विद्यार्थी विचार मंचची पालिकेकडे मागणी**

**पिंपरी : प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात अनेकांच्या घरात पुराचे पाणी शिरले. यामध्ये घरातील इतर साहित्यासह विद्यार्थ्यांच्या शालेय साहित्याचेही नुकसान झाले. या पूरग्रस्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत तातडीने करावी, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंचचे अध्यक्ष धम्मराज साळवे व प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांनी केली आहे.

या संदर्भात महापालिका आयुक्तांना दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, शहरात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला त्यामुळे शहरातील विविध भागात मोठ्या प्रमाणात पुर आला. अनेकांच्या घरात पाणी शिरले. नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. पुराचे पाणी घरात आल्यामुळे मुलांच्या सर्व शैक्षणिक साहित्याचे नुकसान झाले आहे. पालकांना हे साहित्य पुन्हा नव्याने घेणे परवडणारे नाही. त्यामुळे पालिकेच्या वातीने ज्या ज्या ठिकाणी पुर परिस्थिती निर्माण झाली होती. त्या भागांचा सर्व्हे करून पूरग्रस्त विद्यार्थ्यांची माहिती जमा करावी किंवा हेल्पलाईन जाहीर करावी, या पूरग्रस्त विद्यार्थ्यांना तात्काळ शैक्षणिक साहित्याची मदत उपलब्ध करून द्यावी, असे रयत विद्यार्थी विचार मंचने म्हटले आहे.

Pimpri Chinchwad Edition
Jul 30, 2024 Page No. 02
Powered by: erelego.com

साप्ताहिक सत्य स्पष्ट निर्भीड

# जन महाराष्ट्र न्युज

मुख्य संपादक - दादाराव आढाव मो नं :-९४२३२२०४३६

## पिंपरी चिंचवड शहरातील पूरग्रस्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत तात्काळ मदत करावी-संतोष शिंदे.

**या बाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्तांना निवेदन देण्यात आले आहे.**





जन महाराष्ट्र | पिंपरी दि.२९ प्रतिनिधी पिंपरी चिंचवड शहरात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला त्यामुळे शहरातील विविध भागात मोठ्या प्रमाणात पुर आला होता अनेकांच्या घरात पाणी शिरलेले होते. विशेषतः शहरातील नदी किनारी राहणाऱ्या तसेच अनेक झोपडपट्टी भागातील नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शाळा चालू होऊन अवघे काही दिवसच झाले आहेत पालकांनी आपल्या पाल्यांना मोठ्या कष्टाने सर्व शालेय साहित्य घेऊन दिले होते परंतु पुराचे पाणी घरात आल्यामुळे सर्व शैक्षणिक साहित्याचे नुकसान झाले आहे.पालकांना हे साहित्य पुन्हा नव्याने घेणे परवडणारे नाही. तरी पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या वातीने ज्या ज्या ठिकाणी पुर परिस्थिती निर्माण झाली होती अशा भागांचा सर्व्हे करून पूरग्रस्त विद्यार्थ्यांची माहिती जमा करावी अथवा महापालिकेच्या वतीने हेल्पलाईन जारी करावी व या पूरग्रस्त विद्यार्थ्यांना तात्काळ शैक्षणिक साहित्याची मदत उपलब्ध करून द्यावी.सदर विषयाचे निवेदन रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांच्या वतीने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह याना मेलद्वारे देण्यात आले.अशी माहिती रयत विद्यार्थी विचार मंचाचे प्रदेश महा सचिव संतोष शिंदे यांनी दिली

दिनांक ३० जुलै २०२४

# प्रभात

Pimpri_02 August 2024_005
02 Aug 2024

## पूरग्रस्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत करावी

**पिंपरी, दि. १ (प्रतिनिधी)** - नदीला आलेल्या पुरामुळे शहरातील नदीकिनारी राहणाऱ्या तसेच अनेक झोपडपट्टी भागातील नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या घरांमधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्य वाहून गेले तर अनेकांची साहित्य भिजून ते वापरण्यायोग्य राहिले नाही. महापालिका प्रशासनाने पालिका शाळेतील विद्यार्थ्यांना नव्याने शैक्षणिक साहित्य द्यावे, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेने केली आहे.

यावेळी संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांच्या वतीने पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे केली आहे. शहरातील विविध भागात मोठ्या प्रमाणात पूर आला अनेकांच्या घरात पाणी शिरले. पालकांनी आपल्या पाल्यांना मोठ्या कष्टाने सर्व शालेय साहित्य घेऊन दिले होते.परंतु पुराचे पाणी घरात आल्यामुळे सर्व शैक्षणिक साहित्याचे नुकसान झाले आहे. पालकांना हे साहित्य पुन्हा नव्याने घेणे परवडणारे नाही. पूरस्थिती निर्माण झालेल्या भागातील विद्यार्थ्यांची माहिती संकलीत करून, त्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहत्य उपलब्ध करुन द्यावे. अथवा पालिकेच्या वतीने हेल्पलाईन जारी करावी व त्या माध्यमातून ही मदत करण्याची मागणी केली आहे.









## दिनांक ३० जुलै २०२४
## नर्सिंग कोर्स लॅबचे उद्घाटन

देशपातळीवर काम करणारी संस्था म्हणून प्रथम फाउंडेशन या संस्थेचा नावलौकिक आहे.पिंपरी चिंचवड शहरात देखील ही संस्था शैक्षणिक प्रवाहातून बाहेर गेलेल्या महिलांना पुन्हा शैक्षणिक प्रवाहात आणून त्यांच्या सक्षमीकरणासाठी सातत्याने प्रयत्नशील असते. १० वी नापास महिलांसाठी सेकंड चान्स नावाचा उपक्रम ही संस्था राबवते व महिलांनी केवळ शिक्षण घेऊन थांबू नये याकरिता त्यांना रोजगार देखील उपलब्ध झाला पाहिजे याकरिता संस्थेच्या वतीने नर्सिंग कोर्स चालू करण्यात आला आहे.या कोर्स लॅबचे रयत विदयार्थी विचार मंच संस्थेचे प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

लोकमत

# विद्यार्थी चिखल तुडवत गाठताहेत शाळा; मैदानात साचलेय पाणी

## खराळवाडीतील शाळेच्या मैदानात मुरूम टाकण्याची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**खराळवाडी** : महापालिकेच्या खराळवाडीतील शाळेच्या मैदानात पावसाच्या पाण्यामुळे चिखल साचला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना चिखल तुडवत शाळा गाठावी लागते. महापालिकेने यावर आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी पालकांकडून करण्यात आली आहे. याशिवाय शाळेच्या परिसरातही रस्त्यांवर पाणी साचल्याने शाळेत जाताना विद्यार्थ्यांना कसरत करावी लागते.

पिंपरी-चिंचवड शहरात जोरदार पाऊस झाला असून त्यामुळे शहरात ठिकठिकाणी पाणी साचल्याच्या घटना घडल्या आहेत. शाळा परिसरातही मैदानात, रस्त्यांवर पाण्याची तळी साचली आहेत. त्यात डासांची उत्पत्ती होत असल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

खराळवाडी शाळेच्या मैदानात पावसाच्या पाण्यामुळे चिखल झाला असून त्यात पावसाचे पाणीही साचत आहे. या साचलेल्या पाण्यामुळे डास उत्पत्तीचीही शक्यता आहे. महापालिकेकडून दरवर्षी पावसाळ्यात आवश्यक ठिकाणी मुरूम टाकण्याचे काम केले जाते, परंतु यावेळी उशीर झाल्याचे चित्र आहे.




खराळवाडीत महापालिका शाळेच्या परिसरात रस्त्यावर साचलेले पाणी.

शाळेच्या परिसरात चिखल, पाणी साचल्याने परिसर चिखलमय झाला आहे. त्यामुळे रोगराई पसरण्याचा धोका आहे. विद्यार्थ्यांचा विचार करून येथे महापालिकेने मुरुम, खडी टाकावी.

**- धम्मराज साळवे, अध्यक्ष, रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक**

क प्रभाग कार्यालयात पत्रव्यवहार केला आहे. महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी शाळेच्या मैदानाची पाहणी करून शाळेच्या मैदानात चिखल झालेल्या ठिकाणी तीन ट्रक मुरुम टाकला आहे. येत्या काही दिवसांत अजून डस्ट टाकून शाळेचे मैदान व्यवस्थित केले जाईल.

**- जानकी तोडकर, मुख्याध्यापक, महापालिका शाळा, खराळवाडी**

### आजार पसरण्याचा धोका

खराळवाडीत विद्यार्थी शाळेत येता-जाता या पाण्यातून पायी प्रवास करतात. त्यामुळे संसर्गजन्य आजार पसरण्याचा धोका अधिक वाढला आहे.

Hello Pimpri Chinchwad
Page No. 5 Aug 08, 2024
Powered by: erelego.com

दिनांक ०८ ऑगस्ट २०२४







## दिनांक १२ ऑगस्ट २०२४
## बार्टी संशोधक विद्यार्थी कृती समितीला पाठिंबा

महाराष्ट्र शासनाने २५ जुलै २०२४ रोजी BANRF-२०२२ च्या अनुसूचित जातीच्या संशोधक विद्यार्थ्यांच्या अधिछात्रवृती संदर्भातील घेतलेल्या निर्णयांविरोधात दिनांक ५ ऑगष्ट २०२४ पासून बार्टी कार्यालय पुणे येथे बार्टी संशोधक विद्यार्थी कृती समितीच्या वतीने आमची भगिनी विद्यार्थी नेत्या पल्लवी गायकवाड ( व हर्षवर्धन दवणे हे BANRF-२०२२ च्या अनुसूचित जातीच्या संशोधक विद्यार्थ्यांना नोंदणी दिनांकापासून १०० टक्के अधिछात्रवृत्ती देऊन न्याय दयावा या मागणीसाठी बार्टी पुणे येथील कार्यालयसमोर बेमुदत आमरण उपोषणास बसले असून रयत विदयार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांनी उपोषण स्थळी जाऊन भेट घेतली व त्यांच्या या मागणीस संस्थेच्या वतीने पाठिंबा देण्यात आला.








## दिनांक १५ ऑगस्ट २०२४

## स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या पदाधिकारी यांच्या वतीने स्वातंत्र्यदिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर भिमसृष्टी स्मारक पिंपरी येथे ध्वजारोहण करून स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या वीरांना मानवंदना दिली.




दिनांक १५ ऑगस्ट २०२४

युवकांचे मार्गदर्शक PSI राजू भास्कर यांना वाढदिवसाच्या सदिच्छा देताना





दिनांक २०ऑगस्ट २०२४

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे पदाधिकारी मा.प्रल्हाद साबळे यांची बहिण कालकथित सुकेक्षणी साबळे यांच्या वाढदिवसानिम्मित/स्मृतीदिनानिमित्त सरस्वती अनाथ आश्रम दापोडी येथे अनाथ मुलांसोबत केक कट करून वाढदिवस साजरा करण्यात आला.

कालकथित सुकेक्षणी साबळे यांच्या स्मृतिदिनानिम्मित अनाथ आश्रमातील मुलांना अन्नदान व बिस्कीट वाटप करण्यात आले.यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच चे संस्थापक अध्यक्ष मा.धम्मराज साळवे सर, संतोष शिंदे,मयुर जगताप, शांतनू चव्हाण उपस्थित होते..

















## दिनांक २८ ऑगस्ट २०२४

## बार्टी संशोधक विद्यार्थ्यांचा विजयाचा आनंदोत्सव

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे च्या बीएनआरएम-२०२२ च्या ७६३ संशोधक विद्यार्थ्यांना राज्य मंत्रीमंडळात १०० टक्के आधिछात्रवृती देण्याचा निर्णया बद्दल आनंदोत्सव साजरा करण्यात आला...

विद्यार्थी नेते हर्षवर्धन दवने व पल्लवी गायकवाड यांनी ५ ऑगस्टपासुन राज्य शासनाने २५ जुलै २०२४ रोजी जाहीर केलेली ५० टक्के आधिछात्रवृतीच्या निर्णयाविरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे या ठिकाणी बेमुदत आमरण उपोषण सुरु केले होते. तसेच ५०% आधिछात्रवृतीसाठी बार्टीमार्फत ७ ऑगस्ट २०२४ पासून सुरू होणाऱ्या कागदपत्रे पडताळणीवर बहिष्काराची हाक दिली होती. यास विद्यार्थ्यांनी साथ देत बहिष्कार यशस्वी केला. जोपर्यंत निर्णायक बैठकीचे पत्र लिखीत स्वरूपात येणार नाही तोपर्यंत उपोषण मागे घेणार नाही विद्यार्थ्यांच्या या भूमिकेला अखेर २५ ऑगस्ट रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत उजाळा मिळाला असून बार्टी संशोधक विद्यार्थ्यांना संपूर्ण अधिछात्रवृत्ती मंजूर करण्यात आली आहे. विद्यार्थी नेते हर्षवर्धन दवणे व पल्लवी गायकवाड यांनी चालवलेल्या बेमुदत आमरण उपोषणाला यश प्राप्त झाले आहे.

आज या विजयाचा आनंदोत्सव साजरा करण्यासाठी बार्टी संशोधक विद्यार्थी संघर्ष कृती समिती यांच्या वतीने बार्टी कार्यालय पुणे येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.सदर कार्यक्रमात या आंदोलनास पाठिंबा देणाऱ्या संस्था संघटना यांचा सत्कार करण्यात आला.सदर आंदोलनास रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने देखील पाठिंबा देण्यात आला होता याबद्दल बार्टी संशोधक विद्यार्थी संघर्ष कृती समिती यांच्या वतीने संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे,प्रदेश महासचिव संतोष शिंदे,पुणे जिल्हाध्यक्ष अमीर सय्यद,पुणे शहराध्यक्ष रोहन मोहिते यांचा सत्कार करण्यात आला.

तसेच रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने देखील हे

सदर आमरण उपोषण करून हा लढा यशस्वी करणाऱ्या पल्लवी गायकवाड व हर्षवर्धन दवणे या उपोषणकर्त्यांचा भारतीय संविधान प्रास्ताविक देऊन रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, विधानपरिषदेचे आमदार मा.अमित गोरखे, बार्टी महासंचालक मा.सुनील वारे व इतर मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.


WELCOME TO ALL
UMAI KARATE COLOUR BELT &
BLACK BELT EXAMINATION
Day & Date : Sunday - 01/09/2024
Venue : Buddha Vihar Punawale Bus Stop , Near Landon Bridge Punawale
For More Information Please Contact :
9604559140 / iqbalkarate01@gmail.com
SHIHAN . IQBAL H. SHAIKH
Founder President of UMAI






ULTIMATE MARTIAL ARTS (INDIA)
WELCOME TO ALL
UMAI KARATE COLOUR BELT &
BLACK BELT EXAMINATION








## दिनांक ०२ सप्टेंबर २०२४

## परितोषक आणि बेल्ट वितरण कार्यक्रम

पुनवळे ,रावेत येथील आलटीमेट मार्शल आर्ट यांच्या वतीने आयोजित परितोषक आणि बेल्ट वितरण कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती म्हणून रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर यांना आमंत्रित केले तसेच यावेळी उपस्थित विद्यार्थाना  मार्गदर्शन करत प्रशिक्षणार्थी यांना सन्मानित केले.



## दिनांक ११ सप्टेंबर २०२४

## बार्टी महासंचालक सुनील वारे यांची भेट

आज शैक्षणिक कामानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन प्रशिक्षण संस्थेचे महासंचालक मा. सुनिल वारे साहेब यांच्याशी संस्थेचे प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांनी भेट घेतली .साहेबांनी संस्थेच्या कामाची माहिती जाणून घेतली व त्यांनी स्वतः लिहलेले आपण स्पर्धा जिंकत आहोत हे पुस्तक भेट दिले.

शिक्षण | रोजगार | आरोग्य | क्रीडा | कला | महिला सक्षमीकरण

रजि. नं. : महा./१७८६/२०१७/पुणे
F५११६३/पुणे

# रयत विद्यार्थी विचार मंच
(महाराष्ट्र राज्य)

* संस्थापक/अध्यक्ष *
धम्मराज साळवे
मो.: ८०८७५४०३८४

* प्रदेश महासचिव *
संतोष शिंदे
मो.: ९६०४६८३४५९

जा.क्र : RVVM/2024/198

दिनांक : 16/09/2024

प्रति,
मा.पंतप्रधान,
भारत सरकार,दिल्ली
मा.मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य,मुंबई

**विषय : संविधानाचे ७५ वे अमृत मोहत्सवी वर्ष २६ नोव्हेंबर संविधान दिन ते ०६ डिसेंबर रोजी भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करून कार्यक्रमाची सांगता करून विविध उपक्रमांनी साजरा करणेबाबत.**

महोदय,

इंग्रजांच्या जोखडातून देश १५ ऑगस्ट १९४७ साली स्वातंत्र झाला. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखालील मसुदा समितीकडून संविधान स्वीकारले आणि २६ जानेवारी १९५० पासून त्यांची अंमलबजावणी सुरू झाली. भारतीय स्वातंत्र्याचे हिरक महोत्सवी वर्ष २००७ साली साजरे झाले. देश स्वातंत्र होऊन ७० वर्षे झाली, पण संविधानाने नमूद केलेले स्वातंत्र्य या देशातील नागरिकांना मिळते आहे का ? देशामध्ये समता, बंधुता, न्याय नांदते आहे का ? देशाच्या संसदेपासून ते गावच्या वाडीवस्ती, पाड्यांपर्यंतची स्थिती पाहता, एक ना अनेक प्रश्नांचे काहूर या काळात निर्माण झाले. संविधानातील मूल्यआशय जनमानसात रुजवण्यापासून ते अधिकार आणि कर्तव्यांबद्दल मोठे काम करण्याची गरज आहे. **एकीकडे देशाला संविधान मिळण्याच्या घटनेला २०२४ मध्ये ७५ वर्षे पूर्ण होत आहेत, तर दुसरीकडे संविधान बदलाची चर्चाही सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय संविधान बदलले जाणार नाही याची हमी सरकारने जनतेला दिली पाहिजे.**

संपर्क कार्यालय : एम.डी.एम. हाईटस्, खराळवाडी, पिंपरी, पुणे – ४११ ०१८.
www.rayatvvm.org 8624866464 rayatvvmanch@gmail.com

Scanned with OKEN Scanner

**संविधानाचे महत्त्व का?**

संविधानाचे महत्त्व प्रास्ताविकेत सांगितले गेले आहे. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेत संविधान देशाला अर्पण करण्यात आले. संविधान सभेने अतिशय कष्ट घेऊन संविधान तयार केले आहे. २ वर्षे, ११ महिने १७ दिवस यासाठी लागले. सार्वभौम भारत, समाजवादी भारत, धर्मनिरपेक्ष भारत, लोकशाही गणराज्याचा भारत घडवण्याचा निर्धार संविधानाने व्यक्त केला आहे. संविधानाने भारतीयांना सन्मानपूर्वक जीवन जगण्यासाठी न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता ही वैश्विक मूल्ये दिली आहेत. ही मूल्येच संविधानाचे ध्येय व उद्दिष्ट आहेत. संविधान निर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनन्यसाधारण योगदानासाठी संविधान सभेने त्यांना संविधानाचे शिल्पकार म्हणून गौरवले. संविधानाचे ध्येय व उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी, अंमल करण्यासाठी, संविधानाने निर्माण केलेल्या संस्था म्हणजे कायदेमंडळ, न्यायपालिका, कार्यपालिका. मूलभूत अधिकार, त्यांचे जतन व संरक्षणाची न्यायालयीन व्यवस्था, स्वतंत्र न्यायपालिका, संसदीय लोकशाही पद्धत, धर्मनिरपेक्षता, मूलभूत कर्तव्ये, राज्याची कर्तव्ये व जबाबदारी, एकल नागरिकत्व, प्रौढ मताधिकार, केंद्र-राज्य संबंध, मागासवर्गीयांचे हित व त्यासाठी कायदेशीर तरतुदी व संरक्षण, निवडणूक पद्धती, लिखित संविधान, तसेच फेडरल संरचना ही संविधानाची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. म्हणून संविधान महत्त्वाचे आहे.

**संविधानचा अमृत महोत्सव साजरा करण्याची गरज का?**

देशाच्या स्वातंत्र्याला २०२२ मध्ये ७५ वर्षे पूर्ण झाली म्हणून देशभरात 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' देशभर साजरा झाला. यानिमित्ताने केंद्र व राज्य सरकारचे विविध कार्यक्रम झाले. यामुळे नागरिकांमध्ये इतिहासाची आठवण देशाभिमान जागृत झाला. त्याचप्रमाणे २०२२ व २०२३ ला 'घर घर तिरंगा' अभियान भारत सरकारने राबवले. राष्ट्रध्वज ही संविधानाची निर्मिती आहे, हे अभियान दरवर्षी सुरू राहिले पाहिजे. याच धर्तीवर संविधान दिन हा देखील राष्ट्रीय सण आहे यामुळे 'घर घर संविधान' अभियानही राबवणे आवश्यक आहे. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेत संविधान भारताच्या लोकांनी स्वीकारले. या ऐतिहासिक घटनेला २०२४ मध्ये ७५ वर्षे होतात. त्याचप्रमाणे २६ जानेवारी १९५० रोजी देश प्रजासत्ताक झाला. या घटनेला २०२५ मध्ये ७५ वर्षे होतात. त्यामुळे भारत सरकारने व राज्य सरकारने 'संविधानाचे अमृत महोत्सव वर्ष' म्हणून साजरे करावे. संविधानिक हक्क व कर्तव्याचा जागर होण्यासाठी हे आवश्यक आहे.

**संविधान दिन कार्यक्रमाकरिता विशेष बजेटची तरतूद करावी.**

शासनाच्या वतीने संविधान दिन दरवर्षी साजरा केला जातो.परंतु यावर्षी संविधानाला ७५ वर्ष पूर्ण होत असून संविधानाचे अमृत मोहत्सवी वर्ष आहे.याकरिता विशेष उपक्रम घेणे गरजेचे आहे. यावर्षी २६ नोव्हेंबर २०२४ रोजी संविधान दिनाच्या दिवशी या कार्यक्रमाचे उदघाटन करून पुढील सलग १० दिवस म्हणजेच ०६ डिसेंबर २०२४ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर भारतीय संविधानाचे शिल्पकार यांचा महापरिनिर्वाण दिन आहे व भारतीय संविधानाच्या निर्मितीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा खूप मोठा वाटा आहे हे सर्वश्रुत आहे.त्यामुळेच संपूर्ण देश व आपण त्यांचा भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून अभिमानाने गौरव

Scanned with OKEN Sc

करतो.यामुळे बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाण दिनी त्यांना अभिवादन करून चैत्यभूमी दादर मुंबई या ठिकाणी कार्यक्रमाची सांगता करावी.व याकरिता विशेष बजेटची तरतूद करावी.

**संविधान दिनानाबाबत कोणते उपक्रम राबवावे ?**

१) "हर घर तिरंगा" प्रमाणे २६ नोव्हेंबर ते ०६ डिसेंबर या कालावधीत "हर घर संविधान" हा उपक्रम राबवावा २) प्रबोधनात्मक व गीतांचे कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.३) चर्चासत्र,परिसंवाद,डिबेट आयोजित करावे ४) नाटक,पथनाट्य आयोजित करावे ५) सर्व शाळांमध्ये,महाविद्यालयामध्ये भारतीय संविधानाची प्रास्ताविका शाळेच्या दर्शनी भागात व प्रत्येक वर्गात संविधान प्रास्ताविका लावणेबाबत आदेशित करणे. ६) सर्व शाळांमध्ये भारतीय संविधानाच्या पुस्तिका उपलब्ध करून देणे,सर्व शाळा महाविद्यालयामध्ये मध्ये भारतीय संविधानावर निबंध स्पर्धा,वादविवाद स्पर्धा,भाषण स्पर्धा अश्या कार्यक्रम घेणे. ७) २६ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर राज्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाची विशेष सजावट करणे ८ ) संपूर्ण राज्यात भारतीय संविधानाचे महत्व नागरिकांना व्हिडिओ समजावून सांगण्यासाठी LED व्हॅन फिरवणे. ९) सर्व जिल्ह्यात संविधान भवन निर्मिती करणे

तरी आपण लवकरात लवकर या कार्यक्रमाचे नियोजन करावे व संविधानाचे ७५ वे अमृत मोहत्सवी वर्ष मोठ्या उत्साहात साजरे करावे हि नम्र विनंती.

आपले विश्वासू


रयत विद्यार्थी विचार मंच रजि.नं. महा/१७८६/२०१७/पुणे महाराष्ट्र राज्य

धम्मराज साळवे
संस्थापक अध्यक्ष

संतोष शिंदे
प्रदेश महासचिव

## दिनांक १६ सप्टेंबर २०२४
## संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करणेबाबत

संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करणेबाबत भारताचे पंतप्रधान महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.एकनाथ शिंदे यांना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने निवेदन देण्यात आले.



| | | |
|---|---|---|
| ३. | प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग | सदस्य |
| ४. | प्रधान सचिव, इतर मागास व बहुजन कल्याण विभाग | सदस्य |
| ५. | प्रधान सचिव,ग्रामविकास विभाग | सदस्य |
| ६ | प्रधान सचिव,नगरविकास विभाग | सदस्य |
| ७. | सचिव, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| ८. | सचिव, दिव्यांग कल्याण विभाग | सदस्य |
| ९. | सचिव,महिला व बालविकास विभाग | सदस्य |
| १०. | सचिव,अल्पसंख्यांक विकास विभाग | सदस्य |
| ११. | सचिव,संसदीय कार्य विभाग | सदस्य |
| १२. | सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सदस्य सचिव |

उपरोक्त गठीत राज्यस्तर घर घर संविधान समितीमार्फत जिल्हास्तरावरील समित्यांकडून आयोजित करण्यात येणाऱ्या संविधान कार्यक्रमांबाबत नियमितपणे आढावा घेण्यात येईल.


४. घर घर संविधान कार्यक्रम जिल्हास्तरावर राबविण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे **जिल्हास्तरीय समिती** स्थापन करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | पदनाम विभाग | पदनाम |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद | सदस्य |
| ३. | सर्व मुख्याधिकारी,नगरपंचायत/नगरपरिषद/ नगरपालिका | सदस्य |
| ४. | शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ५. | महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ६ | सहाय्यक आयुक्त,समाजकल्याण, | सदस्य |
| ७. | निवासी उपजिल्हाधिकारी, | सदस्य सचिव |

- जिल्हास्तरीय समितीमार्फत राबविण्यात येणाऱ्या घर घर संविधान या कार्यक्रमांची अंमलबजावणी, देखरेख व संनियंत्रण करण्यासाठी जिल्ह्यातील इतर आवश्यक अधिकारी यांचा समितीमधील सदस्य प्रतिनिधी म्हणून समावेश संबंधित जिल्हाधिकारी यांनी आपल्या स्तरावर करावा.

**जिल्हास्तरीय समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील:-**

- संविधान मंचाच्या कार्याची वार्षिक योजना तयार करणे, ज्यामध्ये विविध उपक्रम, कार्यक्रम, चर्चा सत्रे, आणि स्पर्धा आयोजित करण्याचे नियोजन करणे.
- संविधान दिन (२६ नोव्हेंबर) आणि प्रजासत्ताक दिन (२६ जानेवारी) यासारख्या महत्वाच्या तारखावर तसेच महिनावार वेळापत्रक आखून विशेष कार्यक्रम आयोजित करणे.
- सदर समितीने उपरोक्त मार्गदर्शक सूचनांव्यतिरिक्त आपल्या स्तरावरून नावीन्यपूर्ण उपक्रमांचा समावेश करून अधिक चांगल्या रीतीने कार्यक्रमांची अंमलबजावणी करावी.
- संविधान अमृत महोत्सव २०२४-२५ "घर घर संविधान" हा कार्यक्रम २६ नोव्हेंबर, २०२४ पासून साजरा करावा.



५. संविधान अमृत महोत्सव सन २०२४-२५ "घर घर संविधान" हा कार्यक्रम दि.२६ नोव्हेंबर, २०२४ पासून पुढील प्रत्येक वर्षी सर्व जिल्ह्यांमध्ये राबविण्याकरिता संबंधित जिल्हाधिकारी यांनी सदर कार्यक्रमाचे वार्षिक वेळापत्रक तयार करून अंमलबजावणी करावी. तसेच संबंधित जिल्ह्यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याची खात्री व सनियंत्रण संबंधित विभागीय आयुक्त यांनी करावे. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मुल्यमापन करून त्याबाबतची नोंद संबंधित जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद व विभागीय आयुक्त, यांच्या वार्षिक मुल्यांकन अहवालात घेण्यात यावी.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४१०१०१९०८११९३२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIJAY BALKRISHNA WAGHMARE

**( विजय वाघमारे )**
**सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.उपमुख्यमंत्री (गृह), यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन), यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा.विरोधी पक्षनेते,महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा,विधानभवन मुंबई,
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई,
८. सर्व सचिव/प्रधान सचिव/अ.मु.स, सर्व मंत्रालयीन विभाग,
९. सर्व विभागीय आयुक्त,सर्व विभाग,
१०.सर्व जिल्हाधिकारी,
११.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,
१२.निवडनस्ती, शिक्षण-२

## संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करणेबाबत
## रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या मागणीला यश
## धन्यवाद महाराष्ट्र सरकार

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.एकनाथ शिंदे यांना संविधानाचे ७५ वे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करणे त्या अनुषंगाने ९ मागण्या केल्या होत्या त्यापैकी पुढील प्रमाणे मागण्या मान्य करण्यात आल्या.


१ ) हर घर संविधान अभियान राबवण्यात यावे

२) शाळा महाविद्यालयात निबंध,भाषण,चर्चासत्र,वादविवाद स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात.

३) संविधानावर आधारित नाटक, पटनाट्य आयोजित करण्यात यावे.

४) सर्व शाळा, महाविद्यालयाच्या दर्शनी भागात संविधानाची प्रास्ताविका लावणे

५) सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांना संविधानाची माहिती व्हावी याकरिता संविधान पुस्तिका उपलब्ध करून देणे.





## दिनांक २० सप्टेंबर २०२४

### संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करणेबाबत  महापालिकेला निवेदन


संविधानाचे ७५ वे अमृत मोहत्सवी वर्ष २६ नोव्हेंबर संविधान दिनी सुरू करून ०६ डिसेंबर २०२४ रोजी  भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करून कार्यक्रमाची सांगता करून विविध उपक्रमांनी साजरा करणेबाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त 1 जांभळे पाटील तसेच अतिरिक्त आयुक्त ३ मा..इंदलकर साहेब यांना  निवेदन देण्यात आले...





## दिनांक २२ सप्टेंबर २०२४
## कर्मवीर डॉ.भाऊराव पाटील जयंती

शिक्षण महर्षी, रयत शिक्षण संस्था संस्थापक कर्मवीर डॉ.भाऊराव पाटील यांना जयंती निमित्त रयत विद्यार्थी विचार मंच वतीने अभिवादन ....



प्रभात

PCMC_23 Sept 2024

23 Sep 2024

## कर्मवीर भाऊराव पाटील यांना अभिवादन

**पिंपरी, दि. २२ (प्रतिनिधी)** - रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त त्याच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी कर्मवीरांच्या विचारांना उजळणी देत त्यांच्या कार्याची महती उपस्थितांना सांगण्यात आली.

यावेळी संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, प्रदेश महासचिव संतोष शिंदे, प्रदेश सचिव प्रगती कोपरे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष मयूर जगताप, पिंपरी चिंचवड अध्यक्ष अभिषेक चक्रनारायण, अजय चक्रनारायण आदी उपस्थित होते. संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व प्रदेश सचिव प्रगती कोपरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी साळवे यांनी जयंतीच्या शुभेच्छा देताना आपले मत व्यक्त केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षण प्रसारासाठी दिले. महाराष्ट्रातील एक प्रेरणादायी शिक्षणयात्री म्हणून ते ओळखले जातात.

**दिनांक २३ सप्टेंबर २०२४**

**कर्मवीर भाऊराव पाटील जयंती**




**दिनांक २६ सप्टेंबर २०२४**

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे पिंपरी चिंचवड शहर समन्वयक मा.प्रमोद लोंढे यांनी आज त्यांच्या वाढदिवसाचा अतिरिक्त खर्च टाळून संस्थेकडे गरीब,गरजू विद्यार्थ्यांसाठी वह्या व पेन दिले..त्यांना संस्थेच्या वतीने वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा





**दिनांक १८ ऑक्टोबर २०२४**

**डॉ.पांडुरंग भोसले सर यांची प्रभारी_प्राचार्यपदी_निवड**

रयत शिक्षण संस्थेचे महात्मा फुले महाविद्यालयाच्या (पिंपरी) प्रभारी प्राचार्य पदी मा.डॉ.पांडुरंग भोसले सर यांची निवड झाल्याबद्दल रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने शॉल आणि भारतीय संविधानाची प्रास्ताविक देऊन सन्मान करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.









## दिनांक १९ ऑक्टोबर २०२४
## विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना कार्यक्रम

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या सहाय्याने व लाईट हाऊस कम्युनिटीज फाउंडेशन GOYN संस्थेच्या माध्यमातून आज रयत शिक्षण संस्थेच्या पिंपरी येथील महात्मा फुले महाविद्यालयात १० वी पासून ते पदव्युत्तर स्तरपर्यंतच्या शिष्यवृत्तीच्या संधी या विषयावर कार्यशाळा घेऊन याविषयावर रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे प्रदेश महासचिव संतोष शिंदे लाईट हाऊस संस्थेच्या प्रतिनिधी प्रेरणा ओव्हाळ यांनी याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे,माधवी खरात,महाविद्यालयाचे शिक्षक उपस्थित होते....





**दिनांक २२ ऑक्टोबर २०२४**

**मासुम फौंडेशन यांच्या चालते फिरते नाईट स्कुल या संकल्पनेनुसार तयार केलेल्या स्कुल बस ला भेट**

मासुम फौंडेशन यांच्या चालते फिरते नाईट स्कुल या संकल्पनेनुसार तयार केलेल्या स्कुल बस ला भेट देऊन संकल्पना जाणून घेतली यावेळी मासुम संस्थेचे सोमनाथ सर यांनी रयत सोबत कार्य करण्याची इच्छा व्यक्त केली...


NO SMOKING



\


NGO
PCMC







## दिनांक २२ ऑक्टोबर २०२४

## NGO ROUNDTABLE CONFERENCE

लाईटहाऊस संस्थेच्या माध्यमातुन पुणे व पिंपरी चिंचवड शहरात सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांची राऊंडटेबल कॉन्फरन्स अल्पाईन हॉटेल पिंपरी या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती.या कॉन्फरन्स साठी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेला देखील आमंत्रित करण्यात आले होते.या कॉन्फरन्स साठी संस्थेचे प्रदेश महासचिव संतोष शिंदे उपस्थित होते. यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली.तसेच या कॉन्फरन्स मध्ये पिंपरी चिंचवड शहरातील सामाजिक आणि शैक्षणिक समस्या काय आहेत ? त्या समस्या सोडवण्यासाठी सर्व संस्था मिळून काय करू शकतो ? अश्या महत्वपूर्ण विषयांवर चर्चा झाली..यावेळी पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरातील विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते...



## दिनांक २३ ऑक्टोबर २०२४
## आमदार रोहितदादा पवार यांची भेट

काळेवाडी येथे पार पडलेल्या कर्जत जामखेड स्नेह मेळावा कार्यक्रप्रसंगी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने महत्वपूर्ण कामानिमित्त युवा आमदार रोहितदादा पवार यांची भेट घेऊन त्यांना भारतीय संविधानाची प्रास्ताविका भेट देण्यात आली...












## दिनांक २८ नोव्हेंबर २०२४

## GLOBAL CONVENING २०२४

जागतिक पातळीवर काम करणाऱ्या GOYN या संस्थेला ०५ वर्ष पूर्ण झाल्यानिम्मित यावर्षीचे दिनांक १७ नोहेंबर ते २१ नोहेंबर ०५ दिवसीय International Global Convening पुणे या ठिकाणी (बालेवाडी स्टेडियम, गदिमा सभागृह निगडी, हयात रेजन्सि हॉटेल,वडगावशेरी लाईटहाऊस या ठिकाणी ) पार पडले.या कार्यक्रमासाठी संपूर्ण जगभरातून तसेच देशभरातून मोठ्या प्रमाणात तरुण,युवक सहभागी झाले होते.तसेच अनेक मान्यवर मंडळी देखील यामध्ये सहभागी झाली होते.रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे प्रतिनिधी म्हणून प्रगती कोपरे व संतोष शिंदे यांना  या कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळाली.जागतिक पातळीवर काम करणाऱ्या मान्यवरांशी चर्चा केली.रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे कार्य प्रेझेंट करता आले...

महत्वाची भेट GYON संस्थेचे संस्थापक जेमी मेकॉलिफ व  आफ्रिकेच्या GDI संस्थेच्या CEO ॲलिस.






भारताचे संविधान
प्रास्ताविका


भारताचे संविधान
प्रास्ताविका


भारताचे संविधान
प्रास्ताविका


भारताचे संविधान
प्रास्ताविका


भारताचे संविधान
प्रास्ताविका





## दिनांक २६ नोव्हेंबर २०२४
## संविधानाचा अमृत महोत्सवी सोहळा

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने संविधानाचा ७५ व्या अमृत महोत्सवी सोहळ्यानिमित पिंपरी येथील भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले.संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते..

लोकमत

# विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने संविधानाचा पिंपरीत अमृत महोत्सव

## प्रास्ताविकेचे वाचन; आंबेडकरांच्या पुतळ्याला अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** भारतीय संविधानाच्या ७५ व्या अमृत महोत्सवी दिनानिमित्त रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने पिंपरी येथे भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला व भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेला अभिवादन करण्यात आले. तसेच यावेळी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, प्रदेश महासचिव संतोष शिंदे, प्रदेश समन्वयक श्वेता साळवे, राज्य प्रवक्ता व मावळ तालुका महासचिव विक्रांत शेळके, प्रदेश संपर्क प्रमुख व मावळ तालुका प्रमुख अतुल वाघमारे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष मयूर जगताप, पिंपरी-चिंचवड शहर अध्यक्ष अभिषेक चक्रनारायण, शहर उपाध्यक्ष भाग्यश्री आखाडे, श्रीयश कदम, नीलेश आठवले आदी उपस्थित होते.



रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संविधान प्रास्ताविकेला अभिवादन करण्यात आले.

> भारतासारख्या प्रचंड बलशाली राष्ट्राला प्रगतिपथाकडे घेऊन गेली ७५ वर्ष भारतीय संविधान यशस्वीपणे वाटचाल करत आहे. पुढील हजारो वर्ष हे संविधान वाटचाल करेल.
>
> **- धम्मराज साळवे, संस्थापक अध्यक्ष**

> भारत देशात अनेक संस्कृती, विविध बोलीभाषा, विविध प्रांत, जाती, धर्म, प्रथा परंपरा आहेत. हीच आपल्या देशाची सुंदरता आहे. याला अबाधित ठेवण्याचे काम भारतीय संविधान करत आहे. त्यामुळे भारतीय संविधानाचे संवर्धन करणे ही देखील आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.
>
> **-विक्रांत शेळके, संस्थेचे राज्य प्रवक्ता व मावळ - तालुका महासचिव**

Hello Pimpri Chinchwad
Page No. 5 Nov 28, 2024
Powered by: erelego.com

CiVIC मिरर



# भारतीय संविधानाचा अमृत महोत्सवी दिन उत्साहात


▸ **सीविक मिरर ब्यूरो**
feedback@civicmirror.in

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने भारतीय संविधानाचा अमृत महोत्सवी दिन उत्साहात साजरा केला. पिंपरी येथील भिमसृष्टी स्मारकात भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला व भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेला अभिवादन करण्यात आले. यावेळी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

यावेळी भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी दिनाच्या प्रसंगी बोलताना संस्थेचे अध्यक्ष धम्मराज साळवे म्हणाले, भारतासारख्या प्रचंड बलशाली राष्ट्राला प्रगतिपथाकडे घेऊन गेली ७५ वर्षे भारतीय संविधान यशस्वीपणे वाटचाल करत आहे. पुढील हजारो वर्ष हे संविधान वाटचाल करेल. असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. संस्थेचे प्रवक्ते विक्रांत शेळके म्हणाले, भारत देशात अनेक संस्कृती,विविध बोलीभाषा,विविध प्रांत,विविध जाती,विविध धर्म,विविध प्रथा परंपरा आहेत. हीच आपल्या देशाची सुंदरता आहे. याला अबाधित ठेवण्याचे काम भारतीय संविधान करत आहे. त्यामुळे भारतीय संविधानाचे संवर्धन करणे ही देखील आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे अध्यक्ष धम्मराज साळवे,प्रदेश महासचिव संतोष शिंदे,प्रदेश समन्वयक श्वेता साळवे,राज्य प्रवक्ता विक्रांत शेळके,प् रदेश संपर्क प्रमुख अतुल वाघमारे,पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष मयूर जगताप, पिंपरी-चिंचवड शहर अध्यक्ष अभिषेक चक्रनारायण, शहर उपाध्यक्ष भाग्यश्री आखाडे,श्रीयश कदम,निलेश आठवले उपस्थित होते.

Main Edition
Nov 28, 2024 Page No. 4
Powered by: erelego.com





**दिनांक २८ नोव्हेंबर २०२४**

**क्रांतीसुर्य महात्मा फुले स्मृतिदिन**

शिक्षण चळवळीचे प्रणेते,उद्योजक, प्रभावी राजकारणी,समाजसुधारक, क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने अभिवादन करण्यात आले.






**दिनांक ०४ डिसेंबर २०२४**
**गरजु विद्यार्थिनीला शैक्षणिक साहित्याची मदत**

उत्कर्षा आखाडे ही विद्यार्थिनी कैलाशनगर,पिंपरी या ठिकाणी आपल्या आजीकडे राहते. महानगरपालिकेच्या कमला नेहरू शाळेत शिक्षण घेते.पुढे जाऊन काय होण्याची इच्छा विचारल्यावर मला पोलीस अधिकारी व्हायच आहे असे तिने सांगितले.तिला शिक्षणासाठी वह्या,कंपास,स्कूल बॅग,पेनची गरज होती म्हणून ती रयत विद्यार्थी संस्थेच्या ऑफिसला आली.तिला सर्व शैक्षणिक साहित्याची मदत केली..चांगला अभ्यास केला तर दरवर्षी देखील मदत करू असे सांगितले...



















**दिनांक ०४ डिसेंबर २०२४**

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन**

ज्ञानसागर इंग्लिश मिडीयम स्कुल चिखली येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला यावेळी विद्यार्थ्यांना बाबासाहेबांचा शैक्षणिक संघर्ष आणि जीवनगाथा यावर मार्गदर्शन केले यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे,प्रदेश महासचिव संतोष शिंदे, समनव्ययक श्वेता साळवे,सदस्य श्रेयस कदम व शाळा शिक्षक वृंद....

06 Dec Pimpri 2024_005
06 Dec 2024
प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com



**चिखली :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना उपस्थित मान्यवर.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. आंबेडकर यांना अभिवादन

**पिंपरी, दि. ५ (प्रतिनिधी)** - डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ज्ञानसागर इंग्लिश मिडियम स्कूल चिखली यांच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

अभिवादन कार्यक्रम प्रमुख उपस्थितीमध्ये रयत विद्यार्थी विचार मंचाचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे,प्रदेश महासचिव संतोष शिंदे,राज्य समन्वयक श्वेता ओव्हाळ, श्रीयश कदम आदी उपस्थित होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व प्रदीप रॉय यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले.

यावेळी संतोष शिंदे, श्वेता ओव्हाळ, श्रीयश कदम, शाळेचे मुख्याध्यापिका अबोली तापकीर, अनिता हुकेरी, प्रमिला वाघमारे, उषा मिसाळ, पूनम मौर्य, वंदना रणदिवे, वृषाली नोराड, दिपाली कदम, करुणा गायकवाड आदी उपस्थित होते.

**दिनांक ०६ डिसेंबर २०२४**


रयत


रयत


रयत


रयत


रयत


महामानव भारतरत्न
डॉ.बाबासाहेब आंबेडकर



## दिनांक ०६ डिसेंबर २०२४
## डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन
## एक वही एक पेन अभियान

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पिंपरी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर भिमसृष्टी स्मारक येथे एक वही एक पेन अभियान राबवण्यात आले.

यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने राबवलेल्या अभियानाला चिंचवड विधानसभेचे नवनिर्वाचित आमदार मा.शंकर जगताप,विधानपरिषदेचे आमदार मा.अमित गोरखे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष मा.तुषार कामठे,भाजप पक्षाचे शहर कार्याध्यक्ष मा. शत्रुघ्न काटे,माजी नगरसेवक अनुराधा गोरखे,माजी नगरसेविका निकिता कदम,मा. संजय मंगोडेकर,लेखक नामदेवराव जाधव,गायक संकल्प गोळे,पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट बार असोसिएशनचे अध्यक्ष मा.ॲड.गौरव वाळुंज,सचिव ॲड.उमेश खंदारे व सर्व कार्यकारणी,वरिष्ठ पोलीस निरीक्षक मा.कुंभार साहेब अनेक विविध क्षेत्रातील मान्यवरांनी व सर्व आंबेडकरी अनुयायांनी उपस्थित राहून या अभियानात सहभाग घेऊन शुभेच्छा दिल्या...

# प्रभात

प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे

PCMC 7 Dec 2024_015
07 Dec 2024

www.dainikprabhat.com



## 'एक वही, एक पेन' अभियानात ॲड. बार असोसिएशनचा सहभाग

**पिंपरी, दि. ६ (प्रतिनिधी)** - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या वतीने पिंपरी न्यायालयातील पुरुष बार रूम येथे पुष्पहार अर्पण करून पवित्र स्मृतीस अभिवादन करण्यात आले. तसेच 'एक वही, एक पेन' या अभियानात सहभाग नोंदविला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कायम शिक्षणाला महत्व देत समाजाला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा, हा संदेश दिला याचीच प्रेरणा घेत ॲडव्होकेट्स बारच्या वतीने पिंपरी चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण केल्यानंतर रयत विद्यार्थी विचार मंच यांच्या वतीने राबवण्यात येत असलेल्या 'एक वही, एक पेन' या अभियानात सहभागी होत अनोख्या पद्धतीने अभिवादन करण्यासाठी एक सामाजिक भान समजून संस्थेला पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या वतीने वही व पेन देण्यात आले. यावेळी बारचे माजी अध्यक्ष ॲड. राजू माधवन, ॲड. देवराव ढाळे, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. नवीन वालेचा, ॲड. पल्लवी विघ्ने व वकील बांधव उपस्थित होते.

तर अभिवादन सभेचे आयोजन पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनचे विद्यमान अध्यक्ष ॲड. गौरव वाळुंज, उपाध्यक्ष ॲड. अनिल पवार, सचिव ॲड. उमेश खंदारे, महिला सचिव ॲड. रीना मगदूम, सह-सचिव ॲड. राकेश जैद, खजिनदार ॲड. अक्षय फुगे, सदस्य ॲड. संकेत सरोदे, ॲड. विकास शर्मा, ॲड. सीमा शर्मा, ॲड. राजेश राजपुरोहित, ॲड. संघर्ष सूर्यवंशी यांनी केले होते.

# नवराष्ट्र

www.navarashtra.com

## पिंपरी बार असोसिएशनकडून डॉ. आंबेडकरांना अभिवादन



देहूरोड, (वा.) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या वतीने पिंपरी न्यायालयातील पुरुष बार रूम येथे पुष्पहार अर्पण करून पवित्र स्मृतीस अभिवादन करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कायम शिक्षणाला महत्व दिले आणि समाजाला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश दिला याचीच प्रेरणा घेत ॲडव्होकेट्स बार आणि रयत विद्यार्थी विचार मंच यांच्या वतीने 'एक वही, एक पेन' या अभियान घेण्यात आले. यावेळी बारचे माजी अध्यक्ष ॲड. राजू माधवन, ॲड. देवराव ढाळे, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. नवीन वालेचा, ॲड. पल्लवी विघ्ने व वकील बांधव उपस्थित होते.

अभिवादन सभेचे आयोजन पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनचे विद्यमान अध्यक्ष ॲड. गौरव वाळुंज, उपाध्यक्ष ॲड. अनिल पवार, सचिव ॲड. उमेश खंदारे, महिला सचिव ॲड. रीना मगदूम, सह-सचिव ॲड. राकेश जैद, खजिनदार ॲड. अक्षय फुगे, सदस्य ॲड. संकेत सरोदे, ॲड. विकास शर्मा, ॲड. सीमा शर्मा, ॲड. राजेश राजपुरोहित, ॲड. संघर्ष सर्यवंशी यांनी केले होते

Pune Plus Edition

Dec 07, 2024 Page No. 4

Powered by: Navarashtra.com

## पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या वतीने बाबासाहेबांना अभिवादन

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पिंपरी - चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या वतीने पिंपरी न्यायालयातील पुरुष बार रूम येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पवित्र स्मृतीस अभिवादन करण्यात आले.



भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचे ६ डिसेंबर १९५६ रोजी निधन झाले आणि त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी हा दिवस महापरिनिर्वाण दिवस म्हणून पाळला जातो. शुक्रवार, दिनांक ६ डिसेंबर २०२४ रोजी भारतीय राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ६८ वी पुण्यतिथी आहे. समाजसुधारक, अर्थतज्ज्ञ, विचारवंत, राजकारणी आणि स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री भीमराव रामजी आंबेडकर यांनी झोपेतच अखेरचा श्वास घेतला आणि हा दिवस महापरिनिर्वाण दिवस म्हणून गणला जातो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कायम शिक्षणाला महत्त्व दिले आणि समाजाला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश दिला याचीच प्रेरणा घेत ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या वतीने पिंपरी चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती स्मरकास हार अर्पण केल्यानंतर रयत विद्यार्थी विचार मंच यांच्या वतीने राबवण्यात येत असलेल्या 'एक वही, एक पेन' या अभियानात सहभागी होत अनोख्या पद्धतीने अभिवादन करण्यासाठी एक सामाजिक भान समजून संस्थेला पिंपरी - चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या वतीने वह्या व पेन देण्यात आल्या. यावेळी बारचे माजी अध्यक्ष ॲड. राजू माधवन, उपस्थित होते.

साप्ताहिक
सत्य स्पष्ट निर्भीड
जन महाराष्ट्र न्युज
मुख्य संपादक - दादाराव आढाव
मो नं :-९५२३२२०४३६



**प्रतिनिधी..बद्रीनारायण घुगे**

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त पिंपरी चिंचवड ॲड.बार असोसिएशनच्या वतीने बाबासाहेबांना अभिवादन

जन महाराष्ट्र । पिंपरी दि.६ प्रतिनिधी परमपूज्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरि निर्वाण दिनानिमित्त पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या वतीने पिंपरी न्यायालयातील पुरुष बार रूम येथे पुष्पहार अर्पण करून पवित्र स्मृतीस अभिवादन करण्यात आले.भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचे ६ डिसेंबर १९५६ रोजी निधन झाले आणि त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्या साठी हा दिवस महापरिनिर्वाण दिवस म्हणून पाळला जातो. ६ डिसेंबर २०२४, भारतीय राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ६८ वी पुण्यतिथी आहे. समाजसुधारक, अर्थतज्ज्ञ, विचारवंत, राज कारणी आणि स्वतंत्र भारताचे पहिले कायदा मंत्री भीमराव रामजी आंबेडकर यांनी झोपेतच अखेरचा श्वास घेतला

आणि हा दिवस महापरि निर्वाण दिवस म्हणून गणला जातो.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी कायम शिक्षणाला महत्व दिले आणि समाजाला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश दिला याचीच प्रेरणा घेत ॲडव्होकेट्स बार च्या वतीने पिंपरी चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती स्मरकास हार अर्पण केल्यानंतर रयत विद्यार्थी विचार मंच यांच्या वतीने राबवण्यात येत असलेल्या "एक वही, एक पेन" या अभियानात सहभागी होत अनोख्या पद्धतीने अभिवादन करण्यासाठी एक सामाजिक भान समजून संस्थेला पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशन च्या वतीने वह्या व पेन देण्यात आल्या.यावेळी बारचे माजी अध्यक्ष ॲड.राजू माधवन,ॲड. देवराव ढाळे, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. नवीन वालेचा, ॲड. पल्लवी विघ्ने व वकील बांधव उपस्थित होते.

अभिवादन सभेचे आयोजन पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनचे विद्यमान अध्यक्ष ॲड. गौरव वाळुंज, उपाध्यक्ष ॲड. अनिल पवार, सचिव ॲड. उमेश खंदारे, महिला सचिव ॲड. रीना मगदूम, सह-सचिव ॲड. राकेश जैद, खजिनदार ॲड.अक्षय फुगे, सदस्य ॲड. संकेत सरोदे, ॲड. विकास शर्मा, ॲड. सीमा शर्मा, ॲड.राजेश राज पुरोहित, ॲड. संघर्ष सूर्यवंशी यांनी केले होते.





## बार असोसिएशनतर्फे अभिवादन

**पिंपरी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनतर्फे शुक्रवारी (दि. ६) पिंपरी न्यायालयाच्या आवारातील वकिलांच्या कक्षात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पिंपरी येथील डॉ. आंबेडकर चौकात एक वही, एक पेन या उपक्रमातही वकील मंडळी सहभागी झाली होती. अभिवादन सभेत पिंपरी चिंचवड ॲडव्होकेटस बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. गौरव वाळुंज, उपाध्यक्ष ॲड. अनिल पवार, सचिव ॲड. उमेश खंदारे, महिला सचिव ॲड. रीना मगदूम, सह-सचिव ॲड. राकेश जैद, खजिनदार ॲड. अक्षय फुगे, सदस्य ॲड. संकेत सरोदे, ॲड. विकास शर्मा, ॲड. सीमा शर्मा, ॲड. राजेश राजपुरोहित, ॲड. संघर्ष सूर्यवंशी तसेच बारचे माजी अध्यक्ष ॲड. राजू माधवन, ॲड. देवराव ढाळे, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. नवीन वालेचा, ॲड. पल्लवी विघ्ने आणि वकील बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणास कायम महत्व दिले आणि शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश तमाम समाजाला दिला. ही प्रेरणा घेत असोसिएशनने रयत विद्यार्थी विचार मंचाच्या एक वही, एक पेन अभियानात सहभागी होत सामाजिक बांधिलकी जपत संस्थेस सहाय्य केले.

दैनिक
चालु वार्ता
Powered by epaper.chaluwartha.com
07 Dec 2024 - Page 3

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त पिंपरी चिंचवड ॲड.बार असोसिएशनच्या वतीने बाबासाहेबांना अभिवादन

*दै.चालु वार्ता,*
*पिंपरी चिंचवड, प्रतिनिधी*
◀ **बद्रीनारायण घुगे** ▶



**पिंपरी :** परमपूज्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या वतीने पिंपरी न्यायालयातील पुरुष बार रूम येथे पुष्पहार अर्पण करून पवित्र स्मृतीस अभिवादन करण्यात आले. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचे ६ डिसेंबर १९५६ रोजी निधन झाले आणि त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी हा दिवस महापरिनिर्वाण दिवस म्हणून पाळला जातो. ६ डिसेंबर २०२४, भारतीय राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ६८ वी पुण्यतिथी आहे. समाजसुधारक, अर्थतज्ज्ञ, विचारवंत, राजकारणी आणि स्वतंत्र भारताचे पहिले कायदा मंत्री भीमराव रामजी आंबेडकर यांनी झोपेतच अखेरचा श्वास घेतला आणि हा दिवस महापरिनिर्वाण दिवस म्हणून गणला जातो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कायम शिक्षणाला महत्व दिले आणि समाजाला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश दिला याचीच प्रेरणा घेत ॲडव्होकेट्स बार च्या वतीने पिंपरी चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती स्मरकास हार अर्पण केल्यानंतर रयत विद्यार्थी विचार मंच यांच्या वतीने राबवण्यात येत असलेल्या 'एक वही, एक पेन' या अभियानात सहभागी होत अनोख्या पद्धतीने अभिवादन करण्यासाठी एक सामाजिक भान समजून संस्थेला पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशन च्या वतीने वह्या व पेन देण्यात आल्या. यावेळी बारचे माजी अध्यक्ष ॲड. राजू माधवन, ॲड. देवराव ढाळे, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. नवीन वालेचा, ॲड. पल्लवी विघ्ने व वकील बांधव उपस्थित होते.

अभिवादन सभेचे आयोजन पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनचे विद्यमान अध्यक्ष ॲड. गौरव वाळुंज, उपाध्यक्ष ॲड. अनिल पवार, सचिव ॲड. उमेश खंदारे, महिला सचिव ॲड. रीना मगदूम, सह-सचिव ॲड. राकेश जैद, खजिनदार ॲड. अक्षय फुगे, सदस्य ॲड. संकेत सरोदे, ॲड. विकास शर्मा, ॲड. सीमा शर्मा, ॲड. राजेश राजपुरोहित, ॲड. संघर्ष सूर्यवंशी यांनी केले होते.

## दिनांक ०७ डिसेंबर २०२४
## पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशन

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या वतीने रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने राबवण्यात येत असलेल्या "एक वही, एक पेन" या अभियानात सहभागी होत अनोख्या पद्धतीने अभिवादन करण्यासाठी एक सामाजिक भान समजून संस्थेला पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशन च्या वतीने वह्या व पेन देण्यात आल्या.

लोकमत



महापरिनिर्वाण दिनानिमित्त एक वही, एक पेन अभियान राबवण्यात आले.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त एक वही, एक पेन उपक्रम

## रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे अभियान

लोकमत न्यूज नेटवर्क

पिंपरी : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त एक वही, एक पेन अभियान राबवण्यात आले. रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने राबवलेल्या अभियानाला आमदार शंकर जगताप, अमित गोरखे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष तुषार कामठे, भाजपचे शहर कार्यकारी अध्यक्ष शत्रुघ्न काटे, माजी नगरसेवक अनुराधा गोरखे, माजी नगरसेविका निकिता कदम, संजय मंगोडेकर, लेखक नामदेवराव जाधव, गायक संकल्प गोळे, पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. गौरव वाळुंज, सचिव ॲड. उमेश खंदारे आदी उपस्थित होते. या उपक्रमासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, प्रदेश महासचिव संतोष शिंदे, राज्य समन्वयक श्वेता साळवे, राज्य सहसचिव प्रगती कोपरे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष मयूर जगताप, अभिजित लगाडे, अजय चक्रनारायन, योगेश कांबळे, भाग्यश्री आखाडे, सागर गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

### गरजू विद्यार्थ्यांना मोफत वाटप

जमा झालेले साहित्य हे गरीब गरजू विद्यार्थ्यांना मोफत वाटप करण्यात येणार आहे, तरी ज्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची गरज आहे त्यांनी संस्थेच्या वेबसाईट संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

Hello Pimpri Chinchwad
Page No. 4 Dec 08, 2024
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भिड दैनिक

पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com



रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेतर्फे महापरिनिर्वाण दिनानिमित्त 'एक वही एक पेन' अभियानप्रसंगी उपस्थित मान्यवर.

# 'एक वही एक पेन' अभियानास मोठा प्रतिसाद

**पिंपरी : पुढारी वृत्तसेवा**

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेतर्फे राबविण्यात येत असलेल्या 'एक वही एक पेन' अभियानास नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. महापरिनिर्वाण दिनानिमित्त या संस्थेने पिंपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भीमसृष्टी स्मारकाजवळ शुक्रवारी हा उपक्रम घेतला.

संस्थेतर्फे डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेस हार, फुले अर्पण करण्यापेक्षा एक वही व एक पेन दान करून गरीब गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी अपेक्षित अभिवादन करावे, असे आवाहन केले गेले होते. त्यास आंबेडकरप्रेमी आणि अनुयायांनी भरभरुन प्रतिसाद दिला आहे.

या वेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, प्रदेश महासचिव संतोष शिंदे, राज्य समन्वयक श्वेता साळवे, राज्य सहसचिव प्रगती कोपरे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष मयूर जगताप, अभिजित लगाडे, अजय चक्रनारायन, योगेश कांबळे, भाग्यश्री आखाडे, सागर गायकवाड या पदाधिकारी यांनी या अभियानासाठी परिश्रम घेतले.

My Pimpri Edition
Dec 08, 2024 Page No. 01
Powered by: erelego.com

# रयत विद्यार्थी विचार मंच का गरीब छात्रों के लिए 'एक नोटबुक, एक पेन' उपक्रम

भास्कर न्यूज़ | पिंपरी-चिंचवड़



रयत विद्यार्थी विचार मंच संस्था की ओर से डॉ. बाबासाहेब आंबेडकर के महापरिनिर्वाण दिवस के अवसर पर 'एक नोटबुक, एक पेन' उपक्रम शुरू किया गया है। इस उपक्रम को लेकर लगभग 650 नोटबुक और लगभग 500 पेन संग्रहित किये। इसे गरीब और जरूरतमंद छात्रों में वितरित किया जाएगा।

पिछले चार वर्षों से डॉ. बाबासाहेब आंबेडकर की जयंती और महापरिनिर्वाण दिवस के अवसर पर एक नोटबुक, एक पेन मुहिम चलाई जाती है। इस वर्ष यह गतिविधि पिंपरी के भीमसृष्टि में क्रियान्वित की गई। शहर से हजारों अनुयायी भीमसृष्टि पर अभिवादन के लिए आते है। उनसे एक नोटबुक, एक पेन स्वैच्छिक दान के रूप में लिया जाता है।

इस वर्ष विधायक शंकर जगताप, विधान परिषद विधायक अमित गोरखे, तुषार कामठे, शत्रुघ्न काटे, अनुराधा गोरखे, निकिता कदम, संजय मंगोडेकर, लेखक नामदेवराव जाधव, गायक संकल्प गोले, पिंपरी चिंचवड़ एडवोकेट बार एसोसिएशन के अध्यक्ष एड. गौरव वालुंज, सचिव एड. उमेश खंडारे ने हिस्सा लिया।

रयत विद्यार्थी विचार मंच के क्षेत्रीय महासचिव संतोष शिंदे ने कहा, डॉ. बाबासाहब अंबेडकर व्यक्तिगत पूजा को स्वीकार नहीं करते थे। उन्होंने हमेशा सोच और शिक्षा को महत्व दिया। हम गरीब छात्रों को शिक्षा में मदद करने के लिए हर साल यह गतिविधि आयोजित करते हैं। जरूरतमंद स्कूल हमारे संगठन से संपर्क करें। संस्थान की ओर से गरीब छात्रों को ढूंढकर यह सामग्री दी जाती है।

संस्था के अध्यक्ष धम्मराज सालवे, राज्य महासचिव संतोष शिंदे, राज्य समन्वयक श्वेता सालवे, राज्य संयुक्त सचिव प्रगति कोपरे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष मयूर जगताप, अभिजीत लगाड़े, अजय चक्रनारायण, योगेश कांबले, भाग्यश्री अखाड़े, सागर गायकवाड़ ने मेहनत की।

दैनिक भास्कर
Sun, 08 December 2024
https://epaper.bhaskarhindi.com/c/76377641

CiVic मिरर

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त एक वही–एक पेन उपक्रम

## रयत विद्यार्थी मंचतर्फे पिंपरीत गरीब, गरजू विद्यार्थ्यांना केले वाटप




▸ सीविक मिरर ब्यूरो
feedback@civicmirror.in

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त 'एक वही एक पेन' हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमाला नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला. यावर्षी महापरिनिर्वाण दिनी सुमारे ६५० वह्या आणि सुमारे ५०० पेनचे संकलन झाले आहे. याचे वाटप गरीब, गरजू विद्यार्थ्यांना केले जाणार आहे.

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने मागील चार वर्षांपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती व महापरिनिर्वाण दिनानिमित्त एक वही एक पेन हा उपक्रम राबवला जातो. यावर्षी पिंपरी येथील भीमसृष्टी येथे हा उपक्रम राबवण्यात आला. भीमसृष्टी येथे शहरातील हजारो अनुयायी अभिवादन करण्यासाठी येतात. त्यांच्याकडून एक वही, एक पेन स्वेच्छेने दान म्हणून घेतले जाते. या उपक्रमाला आमदार शंकर जगताप, विधानपरिषदेचे आमदार अमित गोरखे, तुषार कामठे, शत्रुघ्न काटे, अनुराधा गोरखे, निकिता कदम, संजय मंगोडेकर, लेखक नामदेवराव जाधव, गायक संकल्प गोळे, पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. गौरव वाळुंज, सचिव ॲड. उमेश खंदारे आदींनी भेट दिली.

रयत विद्यार्थी विचार मंचचे प्रदेश महासचिव संतोष शिंदे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना व्यक्तीपूजा मान्य नव्हती. त्यांनी कायम विचार व शिक्षणाला महत्व दिले. गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत व्हावी म्हणून आम्ही हा उपक्रम दरवर्षी राबवतो. गरजू शाळा आमच्या संस्थेशी संपर्क करतात. तसेच संस्थेकडून गरीब विद्यार्थ्यांचा शोध घेऊन हे साहित्य त्यांना दिले जाते. उपक्रमासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, प्रदेश महासचिव संतोष शिंदे, राज्य समन्वयक श्वेता साळवे, राज्य सहसचिव प्रगती कोपरे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष मयूर जगताप, अभिजित लगाडे, अजय चक्रनारायन, योगेश कांबळे, भाग्यश्री आखाडे, सागर गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

Main Edition
Dec 11, 2024 Page No. 4
Powered by: erelego.com

**एक वही एक पेन अभियान**
**वृत्तपत्रांनी घेतलेली दखल**